# महाराष्ट्र विधानसभा

## पहिले अधिवेशन, २०१६

## अतारांकित प्रश्नोत्तरांची यादी

**प्रश्नांची एकूण संख्या - ५०**

### मुंबईच्या उपनगरातील गोरेगांव पश्चिम येथील सिध्दार्थनगर येथील मोकळ्या जागेचे आरक्षण बदलण्याचा म्हाडाचा प्रस्ताव

**(१) २२९० (२३-१२-२०१४). श्री.अशोक पाटील (भांडूप पश्चिम) :** सन्माननीय **गृहनिर्माण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबईच्या उपनगरातील गोरेगांव पश्चिम येथील सिध्दार्थनगर येथे ११५० चौ.मी.ची. मोकळी जागा असून ही जागा गेली अनेक वर्षे स्किम ऑफ ओपन स्पेस (मोकळ्या जागेसाठी आरक्षण) म्हणून राखीव आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या जागेचे आरक्षण बदलण्याचा म्हाडाचा प्रस्ताव आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, या प्लॉटच्या चारही बाजुला इमारती आहेत व मधोमध ही एकमेव मोकळी जागा असून विभागातील मुलांना खेळण्यासाठी हा भूखंड हवा असल्याने परिसरातील या प्रस्तावास विरोध आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, याप्रकरणी कोणता निर्णय घेतला वा घेण्यात येत आहे ?

**श्री. प्रकाश मेहता (०९-०२-२०१५) :** (१), (२), (३) व (४) गोरेगाव (प.) येथील शास्त्रीनगर अभिन्यायास इमारत क्र.३५, ३६ व ३७ च्या जवळ १२०३.०० चौ.मी. एवढा मोकळा भूखंड आहे. नवीन सिध्दार्थ नगर इमारत क्र. २९ ते ३७ हा भाग पूर्वी सिध्दार्थ नगर अभिन्यासाचा भाग होता व तो मोकळी जागा म्हणून आरक्षित होता. परंतु नंतर शास्त्रीनगर व नवीन शास्त्रीनगर च्या अभिन्यासात सदर भाग समाविष्ट करण्यात आला असून सदर भूखंड सध्या शास्त्रीनगर अभिन्यासाचा भाग आहे. दि. २४.१२.१९९८ अन्वये मंजूर झालेल्या शास्त्रीनगरच्या नवीन अभिन्यासामध्ये सदरील भूखंड “निवासी” म्हणून आरक्षित करण्यात आला आहे. सदर भूखंड निवासी भूखंड म्हणून आरक्षित असल्याने भविष्यात तेथे मुंबईतील मध्यमवर्गीय लोकांसाठी परवडणाऱ्या घरांची गृहनिर्माण योजना प्रस्तावित करता येईल.

सदर अभिन्यासात दुसऱ्या ठिकाणी विभागातील मुलांना खेळण्यासाठी मोकळा भूखंड (R.G.) म्हणून आरक्षित करण्यात आलेला असून भूखंडाचे क्षेत्रफळ ६४५० चौ.मी. एवढे आहे व तो भूखंड महानगरपालिकेला हस्तांतरीत करण्यात आलेला आहे.

---

## पुणे शहरात नव्याने होणा-या बांधकामावर रेन वॉटर हार्वेस्टिंग यंत्रणा अस्तित्वात नसल्याबाबत

**(२) २५११ (२३-१२-२०१४). श्री.संग्राम थोपटे (भोर), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्रीमती निर्मला गावित (इगतपूरी), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पुणे शहरात नव्याने होणा-या बांधकामावर रेन वॉटर हार्वेस्टिंग यंत्रणा बसविणे बंधनकारक असूनही ७५ टक्के इमारतींवर ही यंत्रणाच अस्तित्वात नसल्याचे दिनांक ३ जुलै, २०१४ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय,

(३) असल्यास, पाण्याचा पुनर्वापर करुन रेन वॉटर हार्वेस्टिंग यंत्रणा बसविण्याबाबत शासनान नव्याने बांधकाम करणा-या बांधकाम व्यावसायिकांना सक्त ताकीद दिली आहे काय,

(४) नसल्यास, त्याची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (०४-०८-२०१५) :** (१) व (२) दिनांक १४ ऑगस्ट, २००७ अन्वये रेनवॉटर हार्वेस्टींग बाबत नियम क्रमांक १७, २२ नियमावलीमध्ये समाविष्ट करण्यात आलेला आहे. त्यानुसार पुणे महानगरपालिका हद्दीमधील बांधकाम परवानगी देताना ३००.०० चौ.मी. क्षेत्रापेक्षा जास्त क्षेत्राचे मिळकतींना रेनवॉटर हार्वेस्टींग यंत्रणा करणे बंधनकारक करण्यात आलेले आहे.

विकास नियंत्रण नियमावली तसेच बांधकाम परवानगी देतानाचे संमतीपत्र यामध्ये या नियमाचा समावेश करणेत आलेला आहे. या मिळकतीवरील झालेल्या इमारतीचे भोगवटापत्र देताना तज्ञ रेनवॉटर हार्वेस्टींग सल्लागार यांचे जागेवर काम योग्यरित्या पूर्ण झाले असल्याचे प्रमाणपत्र प्राप्त झाले नंतर तसेच प्रत्यक्ष जागेवर रेनवॉटर हार्वेस्टींग यंत्रणा करणेत आली असल्याची खात्री केल्यानंतर भोगवटा पत्र अदा करण्यात येते.

पुणे महानगरपालिकेतर्फे रेनवॉटर हार्वेस्टींग यंत्रणा अस्वित्वात नसताना भोगवटापत्र देण्यात आलेले नाहीत. सबब रेनवॉटर हार्वेस्टींग यंत्रणा जागेवर अस्तित्वात नाही, अशी वस्तुस्थिती नाही.

(३) व (४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## कौसा मुंब्रा जिल्हा ठाणे येथे महापालिका शाळेच्या इमारतीची दुरुस्ती करण्याबाबत

**(३) २६५७ (२३-१२-२०१४). श्री.अबू आजमी (मानखूर्द शिवाजीनगर) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) कौसा मुंब्रा (जि. ठाणे) येथील शाळेची इमारत उभारण्यात गेली चार वर्षे दिरंगाई करणा-या महापालिकेने आता अचानक ही शाळा तातडीने उभारण्याची निकड भासू लागल्यामुळे त्यासाठी शाळेचा खर्च तब्बल ३ कोटी ४१ लाखांनी वाढविण्यात आला आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, मुंब्रा कौसा विभागात प्राथमिक शाळेसाठी भूखंड आरक्षित असून तिथे शाळेची इमारत बांधण्यास ठाणे पालिकेने सन २००८ - ०९ या वर्षात मंजूरी देवूनही त्यासाठी निविदा प्रक्रियासुध्दा पूर्ण करण्यात येऊनही मूळ अंदाजपत्रक ४ कोटी २७ लाख रुपयांचे असताना त्यापेक्षा १५८० टक्के जादा दराने म्हणजेच ४ कोटी ५३ लाख रुपये खर्चास मंजूरी देत हे काम मे. कंस्ट्रक्शन कंपनीला देण्यात आले, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणांची चौकशी करण्यात आली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व तद्नुसार दोषीविरुध्द कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची सर्वसाधारण कारणे कोणती ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (०४-०७-२०१५) :** (१) हे खरे नाही.

वास्तविकत: विषयाधिन शाळेच्या बांधकामाचे आराखडे तयार केल्यानंतर महानगरपालिकेच्या शहर विकास विभागाने स्टँडर्ड रुम साईज व इतर किरकोळ बदल सूचविल्यामुळे मुळ क्षेत्रफळामध्ये वाढ झाली आहे. परिणामी या कामी लागणाऱ्या मूळ ४, २७,५०,००० एवढ्या खर्चामध्ये रुपये ३ कोटी ४१ लक्ष एवढी वाढ झालेली आहे.

(२) हे खरे नाही.

कौसा येथे प्राथमिक शाळेसाठी भुखंड आरक्षित असून शाळा बांधण्यसाठी ठाणे महानगरपालिकेच्या महासभा ठराव क्र. १६०, दिनांक २० ऑगस्ट, २००८ अन्वये सन २००८-०९ च्या मंजूर दरसूचीनुसार रुपये ४.२७ कोटी एवढ्या रक्कमेसाठी मंजूरी दिली आहे.

यास्तव, दिनांक १६ जुलै, २०१० रोजी याबाबतच्या निविदा मागविण्यास मंजूरी मिळाली आहे. त्यानंतर सदर कामी रुपये ३.९१ कोटी करीता निविदा मागविण्यात आल्या व मे.जय कंन्सट्रक्शन यांची अंदाजखर्च दरापेक्षा १५.८.% ने जास्त दराची निविदा म्हणेजच रुपये ४.५३ कोटीची निविदा स्थायी समिती ठराव क्र.३३०६ दिनांक ३० डिसेंबर, २०१० अन्वये स्विकारण्यात आली. शाळेच्या बांधकामाचे आराखडे दिनांक ९ ऑगस्ट, २०१२ रोजी ठाणे महानगरपालिकेच्या शहर विकास विभागाने मंजूर केल्यानंतर प्रत्यक्ष कामास सुरुवात करण्यात आली आहे.

(३) व (४) प्रश्न उद्भवत नाही.

## चिपळूण (जि.रत्नागिरी) नगरपरिषद अधिपत्याखालील भाजी मंडईमध्ये पालिकेची परवानगी न घेताच अनधिकृतपणे गाळे उभारण्यात आल्याबाबत

**(४) ३१६९ (२३-१२-२०१४). श्री.सदानंद चव्हाण (चिपळूण) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) चिपळूण (जि.रत्नागिरी) नगरपरिषद अधिपत्याखालील भाजी मंडईमध्ये पालिकेची परवानगी न घेताच अनधिकृतपणे गाळे उभारण्यात आले असल्याचे माहे नोव्हेंबर, २०१४ मध्ये वा त्यादरम्यान आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, जुन्या भाजी मंडई इमारतीमधील गाळेधारकांना जागा देण्याचे पालिकेने ठरवूनही अद्यापही त्यांना जागा देण्यात आली नाही, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, सदर अनधिकृत गाळ्यांबाबत तसेच पूर्वीच्या काही गाळेधारकांना ठरल्याप्रमाणे जागा देणेबाबत कोणती कार्यवाही केली आहे वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (२२-०६-२०१५) :** (१) गाळे उभारण्याचे काम सुरु होते हे निदर्शनास आले आहे. हे खरे आहे.
(२), (३) व (४) चिपळूण नगरपरिषद मुख्य सभा ठराव क्र. १६५ दिनांक २५/१०/२०१३ अन्वये सदर ठिकाणी किरकोळ व्यापाऱ्यांसाठी खोके उभारण्याचे काम सुरु होते. या दरम्यान चिपळूण नगरपरिषदेचे सदस्य व इतर पाच यांनी सदर ठराव रद्द कण्याबाबत चिपळूण नगरपरिषदेकडे अर्ज केला होता या अर्जावर सुनावणी होवून नगरपरिषदेने दिनांक २२ ऑगस्ट, २०१४ रोजीचे आदेशान्वये सदर ठराव तहकूब करण्याचा आदेश दिला. या प्रकरणी अध्यक्ष चिपळूण नगरपरिषद यांनी विभागीय आयुक्त, कोकण विभाग याच्याकडे अपिल दाखल असून सदर प्रकरण प्रलंबित आहे.

---

## भिवंडी निजामपूर शहर महानगरपालिकेचा जुना कचरा ठेकेदार भूमिका ट्रान्सपोर्ट, मुंबई या कंपनीने कर्मचा-यांचा पगार दिला नसल्याबाबत

**(५) ३५५९ (२३-१२-२०१४). श्री.रुपेश म्हात्रे (भिवंडी पूर्व) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) भिवंडी निजामपूर शहर महानगरपालिकेचा जुना कचरा ठेकेदार भूमिका ट्रान्सपोर्ट, मुंबई यांनी कामात दिरंगाई केली व कंपनीने कर्मचा-यांचा २ - ३ महिन्याचा पगार दिला नसल्याने माहे नोव्हेंबर, २०१४ च्या सुमारास या ठेकेदारांच्या गाडया जप्त केल्या हे खरे आहे काय,
(२) असल्यास, कामात दिरंगाई केल्याप्रकरणी या ठेकेदारावर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(३) तसेच या कर्मचा-यांचा पगार देण्याबाबत कोणती उपाययोजना केली ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (०६-०८-२०१५) :** (१) व (२) हे खरे नाही. सदर ठेकेदार यांचे काम असमाधानकारक होत असल्याने भिवंडी महानगरपालिकेचा स्थायी समिती ठराव क्र. ११ व १२, दिनांक ६ जानेवारी, २०१४ अन्वये गाड्या न पुरविणे, जंतु नाशक न फवारणे, कचरा न उचलणे या कारणामुळे सदरचा ठेका रद्द केल्यामुळे दिनांक १९ जून, २०१४ पासून काम बंद झाले आहे.

तथापि, सदर ठेकेदार यांच्या कोणत्याही गाड्या जप्त करण्यात आलेल्या नाही.

(३) करारनाम्यानुसार निविदा पत्रातील सर्व अटी व शर्ती या मे. भूमिका ट्रान्सपोर्ट, मुंबई यांच्यावर बंधनकारक आहे. निविदा पत्रातील क्लॉज ५२ (i) (ii) तरतुदीनुसार ते महानगरपालिकेचे कर्मचारी नसल्यामुळे ठेकेदाराने त्यांना वेतन देणे अपेक्षित आहे. सदर ठेकेदार यांनी थकीत वेतनाबाबत कार्यवाही केलेली नाही.

ठेकेदाराने करारातील अटी व शर्ती नुसार काम केलेले नसून ठेकेदार दंडात्मक कारवाईस पात्र असल्याने त्याबाबत ठेकेदार व भिवंडी महानगरपालिकेत वाद असून ठेकेदाराने करारातील लवाद नेमणेबाबत मा.उच्च न्यायालयात याचिका दाखल केली होती.

त्यानुसार मा.उच्च न्यायालयाने निवृत्त न्यायाधिश श्री. एच.डी.पंडित यांना लवाद म्हणुन नियुक्त केले असून सदर प्रकरणी सुनावणी सुरु आहे.

---

### नांदेड जिल्ह्यातील देगलूर नगरपरिषदे अंतर्गतच्या हद्दवाढ प्रस्तावाबाबत

**(६) ३६२३ (२३-१२-२०१४). श्री.सुभाष साबणे (देगलूर) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नांदेड जिल्ह्यातील देगलूर नगरपरिषदे अंतर्गतच्या हद्दवाढ करण्याबाबतच्या देगलूर नगर परिषदेचा प्रस्ताव गेल्या अनेक (सन २००९ पासून) वर्षापासून शासनाकडे प्रलंबित आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, प्रलंबित असण्याची कारणे काय आहेत,

(३) सदर हद्दवाढ प्रकरणी शासनाने आतापर्यंत काय कार्यवाही केली आहे वा करणार आहे ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (०९-०७-२०१५) :** (१) नाही.

(२) प्रश्न उद्भवत नाही

(३) देगलूर नगरपरिषद हद्दवाढीचा प्रस्ताव जिल्हाधिकारी नांदेड यांनी दि. २८.०३.२०१२ च्या पत्रान्वये शासनास सादर केला होता. या प्रस्तावातील त्रुटी दुर करुल विधी व न्याय विभागाच्या सहमतीने देगलूर नगरपरिषदेच्या हद्दवाढी संदर्भात दि. १३.११.२०१३ रोजी प्राथमिक उद्घोषणा करण्यात आली आहे. या प्रकरणी एकही हरकत प्राप्त न झाल्याचे दि. ०४.०६.२०१४ च्या पत्रान्वये जिल्हाधिकारी नांदेड यांनी निदर्शनास आणले. हद्दवाढीबाबतच्या अंतिम अधिसुचनेच्या मसुद्यास आता ग्राम विकास व विधी व न्याय विभागाने नुकतीच मान्यता दिली असून प्रकरण अंतिम श्री. देवेंद्र फडणवीस मा. मुख्यमंत्री टप्प्यात आहे.

---

**मुंबईतील आरोग्यसेविकांना सोयीसुविधा उपलब्ध करुन देण्याबाबत**

**(७) ३६५५ (२३-१२-२०१४). श्रीमती मनिषा चौधरी (दहिसर) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबईतील आरोग्यसेविका यांना दरमहा दिले जाणारे मानधन हे अल्प असून त्यांना शासनाव्दारे दिल्या जाणा-या अन्य कोणत्याही सोयीसुविधा व भविष्याची तरतूद अद्याप उपलब्ध करुन देण्यात आली नसल्याचे माहे नोव्हेंबर, २०१४ मध्ये निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, आरोग्यसेविकांना मुंबई महानगरपालिकेच्या कायम कर्मचा-यांच्या धर्तीवर आरोग्यसेविका हे पद महानगरपालिकेच्या आस्थापना अनुसूचीवर आणून महानगरपालिका कर्मचा-यांप्रमाणेच सर्व प्रकारचे फायदे देण्यात यावेत, अशी मागणी वारंवार होत आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदरहू प्रकरणी कोणती कार्यवाही करण्यात आली वा येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (०४-०८-२०१५) :** (१) हे खरे नाही, जागतिक बँकेच्या अर्थसहाय्याने नोव्हेंबर, १९८८ पासून सार्वजनिक आरोग्य खात्यातंर्गत भारत लोकसंख्या प्रकल्प-५ कार्यान्वित करण्यात आला. त्यासाठी स्वयंसेवी कार्यकर्त्यांना " महिला आरोग्य स्वयंसेविका" म्हणून रु. २००/- इतक्या निश्चिम मानधनावर दिनांक १ नोव्हेंबर, १९९० पासून सहभागी करुन घेण्यात आले. नंतर वेळोवेळी त्यांच्या मानधनात वाढ करुन त्यांना रु ४०००/- इतके मानधन देण्यात येत होते. सद्य:स्थितीत दिनांक १ एप्रिल, २०१४ पासून पूर्वलक्षी प्रभावाने त्यांच्या मानधनात रु १०००/- ची वाढ करुन ते रु. ५०००/- इतके करण्यात आलेले आहे. त्या स्वयंसेविका असून अर्धवेळ स्वंयसेवा देतात. त्यांना दरवर्षी दिवाळी सणानिमित्त रु. ३५००/- भाऊबीज भेट म्हणून देण्यात येते.

(२) हे खरे आहे.

(३) हंगामी महिला आरोग्य स्वयंसेविका या स्वयंसेविका या अर्थाने महानगरपालिकेस मानसेवा देत आहेत. त्यांना महानगरपालिकेत सामावून घेणे हे मनपा सेवानियमावलीत बसत नाही. त्यामुळे महानगरपालिकेच्या कायम कर्मचाऱ्यांप्रमाणे त्यांना महानगरपालिकेमध्ये सामावून घेता येणार नाही.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**मुंबईत जुन्या उपकर प्राप्त इमारतीच्या** पुनर्विकासातून **म्हाडाला उपलब्ध तयार घरे म्हाडाला न देता परस्पर बिल्डरांनी (विकासकांनी) अतिरिक्त क्षेत्रफळ गैरव्यवहार केल्याबाबत**

**(८) ४०७३ (२३-१२-२०१५). श्री.बाळासाहेब मुरकुटे (नेवासा) :** सन्माननीय **गृहनिर्माण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबईत जुन्या उपकर प्राप्त इमारतीच्या पुनर्विकासातून म्हाडाला उपलब्ध तयार घरे

म्हाडाला न देता परस्पर बिल्डरांनी (विकासकांनी) अतिरिक्त क्षेत्रफळ गैरव्यवहार केला आहे, हे खरे काय,
(२) असल्यास, उपकर प्राप्त इमारतीच्या पुनर्विकासातून म्हाडाला अतिरिक्त क्षेत्रफळाच्या माध्यमातून घरे न देणा-या ३३ बिल्डरांविरुध्द शासनाने काय कारवाई केली आहे,
(३) असल्यास, कारवाईचे स्वरुप कोणते,
(४) असल्यास, अद्यापपर्यंत कारवाई न करण्याचे कारणे काय आहेत ?

**श्री.प्रकाश मेहता (०८-०७-२०१५) :** (१) मुंबई शहर बेटावरील जुन्या उपकरप्राप्त इमारतींच्या पुनर्विकासानंतर म्हाडास देय असलेले अतिरीक्त बांधकाम क्षेत्रफळ म्हाडास दिलेले नाही, अशा ३३ प्रकरणांमधून म्हाडास १४३९७.२७ चौ. मी. क्षेत्र देय असल्याचे सन २०११ मध्ये निदर्शनास आले.
(२) व (३) गृहनिर्माण विभागाच्या दिनांक १५ ऑक्टोबर, २०१२ च्या पत्राद्वारे सदर ३३ प्रकरणांमध्ये कारवाई करण्याच्या सूचना म्हाडास देण्यात आल्या. सदर ३३ प्रकरणांपैकी दोन प्रकरणी विक्रीयुक्त घटकांच्या इमारतीचे बांधकम अद्याप सुरु झाले नसल्याने, एक प्रकरण न्यायप्रविष्ट असल्याने तर एका प्रकरणांमध्ये विकासकाने त्यांचेविरध्द गुन्हा दाखल होण्यापुर्वीच म्हाडास अतिरीक्त बांधकाम क्षेत्रफळ सुपुर्द केल्याने उर्वरीत २९ प्रकरणांमध्ये म्हाडामार्फत गुन्हे नोंदविण्यात आले आहेत. सदर प्रकरणांमध्ये मुंबई आर्थिक गुन्हे अन्वेषन विभागातर्फे तपास सुरु आहे. सदर २९ प्रकरणांमध्ये विकासकांना अतिरिक्त बांधकाम क्षेत्रफळ त्याच इमारतीत देणे शक्य नसल्यास त्याच विभागातील अन्य इमारतींमध्ये सुपुर्द करण्यासाठी तसेच अतिरीक्त बांधकाम क्षेत्रफळ सुपुर्द न केलेल्या कालावधीकरीता दंड भरण्याच्या सुचना म्हाडामार्फत देण्यात आल्या आहेत, सद्यस्थितीत म्हाडास देय असलेल्या अतिरिक्त क्षेत्रफळापैकी ६०३५ चौ.मी. क्षेत्रफळ व २८.०२ चौ.मी. क्षेत्रफळापोटी रोख रक्कम रु. ४१,३२,५२०/- व दंडापोटी रु. ६.२९ कोटी इतकी रक्कम प्राप्त झाली आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## राज्यातील यंत्रमाग उद्योगासह विविध उद्योगातील कामगारांच्या किमान वेतनाचे दर पुनर्निधारित करण्याचा प्रस्ताव प्रलंबित असल्याबाबत

**(९) ८५३० (०७-०४-२०१५). श्री.सुरेश हाळवणकर (इचलकरंजी) :** सन्माननीय **कामगार मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्यातील यंत्रमाग उद्योगासह विविध उद्योगातील कामगारांच्या किमान वेतनाचे दर पुनर्निधारित करण्याचा प्रस्ताव शासनाच्या विचाराधिन आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, राज्यातील यंत्रमाग उद्योगातील कामगारांच्या किमान वेतनाचे दर गेल्या २० वर्षापासून पुनर्निधारित केलेले नाहीत, हे खरे आहे काय,
(३) असल्यास, वरील विलंब होण्याची सर्वसाधारण कारणे कोणती व किमान वेतनाचे दर केव्हा पर्यंत जाहीर होण्याचे अपेक्षित आहे ?

**श्री. प्रकाश मेहता (२०-०६-२०१५) :** (१) व (२) होय.

यंत्रमाग उद्योगातील कामगाराच्या किमान वेतनाचे दर दिनांक १० जानेवारी, १९८६ च्या अधिसूचनेनंतर, दिनांक २९ जानेवारी, २०१५ च्या शासन अधिसूचनेन्वये पुनर्निर्धारित करण्यात आले आहेत.

(३) शासनाने यंत्रमाग उद्योगातील कामगारांचे किमान वेतन पुन:निर्धारणा करण्याबाबत दिनांक १७ डिसेंबर, २००२ रोजी मसुदा अधिसूचना प्रसिध्द केली होती. सदर अधिसूचनेवर मालक व कामगार संघटनांकडून हरकती प्राप्त झाल्यामुळे, दिनांक २५ फेब्रुवारी, २००४ रोजी तत्कालिन मा.राज्यमंत्री (कामगार) यांच्याकडे बैठक आयोजित करण्यात आली होती. सदर बैठकीत यंत्रमाग कामगार हे पीस-रेटवर काम करीत असल्यामुळे त्यांना पीस-रेट पध्दतीने वेतन देण्याबाबत ठरले होते.

त्यानुसार किमान वेतन निश्चित करण्याकरिता दिनांक ४ जून, २००९ रोजी तज्ञ सदस्यांची समिती १ वर्षाकरिता गठीत करण्यात आली होती. सदर समितीने मुदतीत कार्यवाही न केल्यामुळे नवीन समिती गठीत करण्याबाबत कामगार आयुक्त कार्यालयाकडून प्रस्ताव मागवून तत्कालीन मा.उपमुख्यमंत्री यांचेकडे प्रस्ताव सादर करण्यात आला होता.

तथापि, दिनांक २१ जून, २०१२ रोजी मंत्रालयात लागलेल्या आगीत संबंधित कागदपत्रे नष्ट झाली. तद् नंतर दिनांक २ एप्रिल, २०१३ च्या शासन निर्णयान्वये समिती गठीत करण्यात आली. सदर समितीने दिनांक २० ऑगस्ट, २०१४ रोजी अहवाल सादर केला. वरील कारणांमुळे प्रस्तुत अधिसूचना निर्गमित होण्यास विलंब झालेला आहे.

दरम्यान, यंत्रमाग कामगारांचे किमान वेतनाचे दर निर्धारित करण्याबाबत शासनाने दिनांक २२ ऑक्टोबर, २०१३ रोजी मसुदा अधिसूचना निर्गमित केली. त्यांनतर दिनांक २९ जानेवारी, २०१५ रोजी यंत्रमाग उद्योगातील रोजगारांबाबत अंतिम अधिसूचना निर्गमित करण्यात आली आहे.

---

## सिंधुदुर्ग जिल्हयातील वेंगुर्ले कामळेवीर बाजार ते होडवाडा चव्हाटा रस्त्याचे काम करण्याबाबत

**(१०) ९०३५ (०९-०४-२०१५). श्री.संजय कदम (दापोली), श्री.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा), श्री.भास्कर जाधव (गुहागर) :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) सिंधुदुर्ग जिल्हयातील वेंगुर्ले कामळेवीर बाजार ते होडवाडा चव्हाटा रस्त्याचे काम करण्याबाबत अनेकवेळा निवेदने देवूनही सदर रस्त्याचे काम माहे जानेवारी, २०१५ मध्ये वा दरम्यानही सुरु करण्यात आले नाही, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रकरणी शासनामार्फत चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व तदनुसार सदर रस्त्याचे काम तातडीने करणेबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्रीमती पंकजा मुंडे (२१-०७-२०१५) :** (१) प्रश्नांकित रस्त्याबाबत कोणतेही निवेदन प्राप्त नाही,
(२) प्रश्न उद्भवत नाही.
(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

**राज्य शासनाच्या सेवेत असलेल्या सत्यवान धनेगावे हे मिरा भाईंदर महानगरपालिकेत सहायक नगररचना संचालक म्हणून सात वेळा प्रतिनियुक्तीवर असल्याबाबत**

**(११) १०६९० (०७-०४-२०१५). श्री.प्रताप सरनाईक (ओवळा माजिवडा), श्री.अर्जुन खोतकर (जालना) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्य शासनाच्या सेवेत असलेल्या सत्यवान धनेगावे यांना मिरा भाईंदर महानगरपालिकेत सहायक नगररचना संचालक म्हणून सात वेळा प्रतिनियुक्तीवर पाठविण्यात आले आहे, हे खरे आहे काय

(२) असल्यास, सदर अधिकाऱ्याला दिनांक २४ मार्च, २०१३ नंतर प्रतिनियुक्तीवर मुदतवाढ दिली नसतांनाही ते आजही पालिकेच्या सेवेत सहायक नगररचना संचालक या पदावर कार्यरत असल्याचे, नुकतेच निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय

(३) असल्यास, त्यांची मुदत संपल्याने तरी त्यांनी प्रभारी आयुक्त भरत शितोळ यांच्या दिनांक १ ऑक्टोंबर, २०१३ ते ३० डिसेंबर, २०१३ या तीन महिन्याच्या कालावधीत शहरातील तब्बल ६५ इमारतींना सुधारित बांधकाम परवानग्या आणि ७३ इमारतींना भोगवटा दाखला दिल्याचे निदर्शनास आले आहे काय,

(४) असल्यास, या प्रकरणी चौकशी केली आहे काय, चौकशीचे निष्कर्ष काय आहेत व त्यानुषंगाने संबंधितावर कोणती कारवाई केली आहे वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (०४-०८-२०१५) :** (१) नाही. श्री.सत्यवान धनेगाव यांना त्यांच्या दि.३१.०३.२०१५ च्या आदेशान्वये मिरा भाईदर महानगरपालिकेत सहायक नगर रचनाकार पदावर तीन वेळा खालील कालावधीसाठी प्रतिनियुक्तीवर पाठविण्यात आले आहे.

(१) दि. ०९.०७.१९९९ ते दि. ३१.०८.२००२

(२) दि. ०२.११.२००२ ते दि. ०१.११.२००४

(३) दि. २४.०३.२०१० ते दि. ३१.०३.२०१५

(२) नाही. आयुक्त, मिरा भाईंदर महानगरपालिका यांनी त्यांच्या दि. ३१.०३.२०१५ च्या आदेशान्वये श्री.सत्यवान धनेगावे, सहाय्यक नगर रचनाकार यांना महानगरपालिकेच्या सेवेतून एकतर्फी कार्यमुक्त केले असून, नगर विकास विभाग शासन निर्णय क्र.बदली-१११५/४६५/प्र.क्र.९१/नवि-२७, दि. ०१.०६.२०१५ अन्वये त्यांची सहाय्यक संचालक, नगर रचना, ठाणे शाखा कार्यालयात पदस्थापना करण्यात आली आहे. तसेच श्री.धनेगावे यांच्या मिरा भाईंदर महानगरपालिका येथील दि. २५.०३.२०१३ ते दि. ३१.०३.२०१५ पर्यंतच्या सेवा कालावधीस मुदतवाढ मंजूर करण्यात आलेली आहे.

(३) दि. ०१.०१.२०१३ ते दि.३०.१२.२०१३ या कालावधीत महानगरपालिकेमार्फत विहित कार्यपध्दतीचा अवलंब करुन ६६ सुधारीत बांधकाम परवानगी व ७४ भोगवटा दाखले मंजूर विकास नियंत्रण नियमावलीप्रमाणे देण्यात आलेले आहेत.

(४) सदर प्रकरणी प्रकरण निहाय फेरछाननी महानगरपालिकेकडून करण्यात येत आहे.

(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**रावेर व फैजपूर (जि.जळगांव) नगरपालिकांच्या हद्दवाढ प्रस्तावाबाबत**

**(१२) १०८४९ (०६-०४-२०१५). श्री.हरीभाऊ जावळे (रावेर) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) रावेर व फैजपूर (जि.जळगांव) नगरपालिकांच्या हद्दवाढ प्रस्तावास मान्यता न मिळाल्याने या शहरांतील वाढीव भागातील जनतेस नागरी सुविधा मिळत नाहीत, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या शहरांतील वाढीव भागातील जनतेस नागरी सुविधा मिळण्यास रावेर व फैजपूर नगरपालिकांच्या हद्दवाढ प्रस्तावास मान्यता देण्यास शासनाकडून कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (०९-०७-२०१५) :** (१) नाही.

(२) व (३) जिल्हा जळगांव येथे रावेर व फैजपूर नगरपरिषद यांचा हद्दवाढ करण्याबाबतचा प्रस्ताव विचाराधीन होता. तथापि सन २०११ च्या जनगणनेनुसार क्षेत्रिय स्तरावरील परिस्थितीत फरक पडत असल्याचे लक्षात घेऊन या प्रकरणांचा पुनर्विचार करुन आवश्यकता असल्यास सुधारीत प्रस्ताव सादर करण्यास जिल्हाधिकारी जळगांव यांना दि.०२.०८.२०१४ च्या पत्रान्वये कळविण्यात आले आहे.

---

**पुणे शहरातील स्वारगेट येथील उड्डाणपुलाचे काम करीत असताना**
**पर्यायी वाहतुकीची योग्य व्यवस्था नसल्याबाबत**

**(१३) १०८६४ (०६-०४-२०१५). श्री.योगेश टिळेकर (हडपसर), श्री.जगदीश मुळीक (वडगाव शेरी), श्री.भिमराव तापकीर (खडकवासला) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पुणे शहरातील स्वारगेट येथील उड्डाणपुलाचे काम करीत असताना पर्यायी वाहतुकीची योग्य व्यवस्था नसल्याने येथून प्रवास करणे धोक्याचे झाले आहे, त्यामुळे अपघात होण्याची शक्यता निर्माण झाली आहे अशी मागणी प्रवाशांनी माहे जानेवारी, २०१५ च्या दुसऱ्या आठवड्यात केली, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सातारा रस्ता, सोलापूर रस्ता व सारसबागेकडे येणारा रस्ता यांना जोडणाऱ्या उड्डाणपुलाच्या कामामुळे येथे वाहतूक कोंडी होत आहे, स्वारगेट एस.टी डेपोकडे येणाऱ्या प्रवाशांची संख्या जास्त आहे, स्थानिक पी.एम.पी.एल. च्या बससाठी तात्पुरते बस थांबे तयार करण्यात आले आहे, या गर्दीमुळे नागरिकांना जीव मुठीत धरुन रस्ता ओलांडावा लागत आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, या ठिकाणी पर्यायी व्यवस्था करण्यासाठी व सदर उड्डाणपुलाचे काम पूर्ण होण्यासाठी शासनाने कोणती कार्यवाही केली आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (०४-०८-२०१५) :** (१) नाही.
(२) व (३) महाराष्ट्र राज्य रस्ते विकास महामंडळामार्फत नियुक्त स्वारगेट उड्डाणपुलाचे ठेकेदारांमार्फत व्यवस्था करण्यात आलेली आहे.

(अ) सातारा रस्ता, सोलापूर रस्ता, सारसबाग रस्ता या रस्त्यावरील पुणे महानगर परिवहन व्यवस्था सुरळीत करण्यासाठी पोलीस वाहतूक शाखा यांचेबरोबर विचार विनिमय करुन उड्डाणपुलाच्या बांधकामामध्ये येणारे बसथांबे तसेच सातारा रस्ता, लक्ष्मीनारायण थिएटर येथील १, जेधे चौक ते कात्रज या रस्त्यावरील ४, शंकरशठ रस्त्यावरील २, सारसबाग रस्त्यावरील २ याप्रमाणे पुणे महानगर परिवहन महामंडळाचे बसथांबे योग्य जागेवर हलवून घेण्यात आलेले आहेत.

(ब) पादचाऱ्यांना रस्ता कॉसिंग करण्यासाठी रस्त्यावर झेब्रा पट्टे मारण्यात येवून सुचना फलक बसविण्यात आले आहेत. वाहतूक पोलीस यंत्रणेमार्फत पादचाऱ्यांना नियंत्रित करण्याची व्यवस्था केलेली आहे.

(क) उड्डाणपुलाच्या कामाची जागा कठडे लावून सुरक्षित करण्यात आल्यामुळे वाहतुकीला अडथळा होणार नाही याची काळजी घेण्यात आलेली आहे.

(ड) जेधे चौकात वाहतुकीला अडथळा करणारे पथारीवाले, हातगाडीवाले यांना हटविण्यासाठी अतिक्रमण पथक तैनात ठेवण्यात आलेले आहे.

प्रस्तुत कामापैकी स्वारगेट एस टी महामंडळ गेट ते लक्ष्मीनारायण थिएटर चौक ते साईबाबा मंदिरापर्यंत ५२७ मी. लांबीच्या उड्डाणपुलाचे काम पूर्ण होऊन तो दि. २० जून, २०१५ रोजी वाहतूकीस खुला करण्यात आला आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## सावित्रीबाई फुले विद्यापीठाच्या नव्या बांधकामांसाठी विद्यापीठ प्रशासनाने महानगरपालिकेची अधिकृत परवानगी न घेतल्याबाबत

**(१४) १०८७५ (०७-०४-२०१५). श्री.योगेश टिळेकर (हडपसर), श्री.जगदीश मुळीक (वडगाव शेरी), श्री.भिमराव तापकीर (खडकवासला), श्री.विजय काळे (शिवाजीनगर), श्रीमती माधुरी मिसाळ (पर्वती) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) पुणे शहरातील सावित्रीबाई फुले विद्यापीठाच्या नव्या बांधकामांसाठी विद्यापीठ प्रशासनाने

महानगरपालिकेची अधिकृत परवानगी न घेता बांधकाम केल्याची घटना माहे जानेवारी, २०१५ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आली, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, पुणे विद्यापीठाच्या एकूण ४५० एकरामध्ये १३१ एकर परिसरावर बांधकाम करण्यासाठी विद्यापीठाकडे परवानगी आहे, परंतू नवीन बांधकाम करताना विद्यापीठाने महापालिकेकडून स्वतंत्र परवानगी घेणे अपेक्षित आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, महापालिकेची परवानगी न घेता विद्यापीठाने केलेल्या बांधकामाबाबत शासनाने चौकशी केली आहे काय,
(४) असल्यास, चौकशीमध्ये काय निष्पन्न झाले,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (१०-०८-२०१५) :** (१) होय.
(२) होय.
(३) व (४) सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाच्या सदर मिळकतीच्या अनुषंगाने विद्यापीठाकडून जानेवारी, २०१५ मध्ये प्रस्ताव प्रस्ताव झाल्यानंतर संबंधित जागेवरील अस्तित्वातील केलेल्या बांधकामासह नियोजित बांधकामास दिनांक ४.२.२०१५ रोजी परवानगी देण्यात आली आहे.
(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## मुंबईतील सुमारे ७ टक्के लोकसंख्या झोपडपट्टी भागात राहात असल्याबाबत

**(१५) १०९२३ (०६-०४-२०१५). श्री.बसवराज पाटील (औसा) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) मुंबईतील सुमारे ७ टक्के लोकसंख्या झोपडपट्टी भागात राहत असून या झोपडपट्टयांना सर्व प्रकारच्या सुविधा पालिकेतर्फे पुरविल्या जात असून त्यासाठी दरवर्षी पालिकेच्या अर्थसंकल्पात दीडशे ते दोनशे कोटीची तरतूद करुन विकासांच्या योजना राबविल्या तरीही कोट्यवधी रुपये खर्च केल्यानंतरही प्रत्यक्षात झोपडपट्टया विकासांपासून वंचित राहिल्या असून भकास स्थितीत आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, झोपडपट्टयासाठी सर्व विकास कामे एकत्रितपणे राबविण्याबाबत महापालिकेने निर्णय घेतला असून महानगर क्षेत्रातील ट्रॉम्बे, गोवंडीत पायलट प्रोजेक्ट राबविण्याचाही बृहन्मुंबई महापालिकेने ठरविले आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, सदरहू पायलट प्रोजेक्टचे थोडक्यात स्वरुप काय आहे ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (०४-०८-२०१५) :** (१) मुंबईतील झोपडपट्ट्यांमध्ये विविध प्रकारच्या सेवासुविधा पुरविण्यासाठी बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या अर्थसंकल्पात महसुली तसेच भांडवली खर्चासाठी तरतुदी करण्यात येतात. झोपडपट्ट्यांमधील विविध रस्ते व पदपथांच्या सुधारणा, सार्वजनिक शौचालये / शौचकुपे यांच्या दुरुस्त्या तसेच गलिच्छ वस्त्यांच्या सुधारणा इत्यादीसाठी सन २०१०-११, २०११-१२, २०१२-१३ व सन २०१४-१५ मध्ये अनुक्रमे रु. १०२.७०

कोटी रु. ८५.७६ कोटी रु. ८८.६५ कोटी, रु.१४२.७६ कोटी व रु. १६६.११ कोटी इतकी रक्कम खर्च झालेली आहे. त्यानुसार झोपडपट्ट्यांचा विकास टप्प्याटप्प्याने होत असल्याचे दिसून येते. तसेच सन २०१५-१६ च्या अर्थसंकल्पीय अंदाजात झोपडपट्ट्यांच्या विविध दुरुस्त्यांच्या महसुली खर्चासाठी रु. १०६.०६ कोटी आणि भांडवली खर्चासाठी रु. १०६.८५ कोटी अशी एकूण २१२.९१ कोटीची तरतूद करण्यात आलेली आहे. भांडवली खर्चासाठी केलेल्या रु. १०६.८५ कोटी तरतुदीमध्ये रु. १० कोटीची तरतूद एकात्मिक गलिच्छ वस्ती विकास कार्यक्रमासाठी केलेली आहे.

(२) हे खरे आहे.

(३) बृहन्मुंबई महानगरपालिकेतर्फे मानखुर्द येथे मुलभूत सुविधा उपलब्ध करुन देण्याचा प्रस्ताव तयार करण्यात आला आहे. मानखुर्द (पूर्व) येथील महाराष्ट्र नगर येथील झोपडपट्टीमध्ये प्राथमिक स्वरुपात मुलभूत सुविधा उपलब्ध करुन देण्यासाठी सामायिक गल्ल्या, सार्वजनिक शौचालये, छोट्या नाल्यांची दुरुस्ती इत्यादी कामे करण्यात येणार आहेत.

---

### मुंबई महानगरपालिकेतर्फे 'ए' विभागात प्रायोगिक तत्वावर राबविण्यात येणाऱ्या नवीन पे अॅण्ड पार्क धोरणाबाबत

**(१६) ११२५९ (०७-०४-२०१५). श्री.ज्ञानराज चौगुले (उमरगा), डॉ.बालाजी किणीकर (अंबरनाथ) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबई महानगरपालिकेतर्फे 'ए' विभागात प्रायोगिक तत्वावर राबविण्यात येणाऱ्या नवीन पे अॅण्ड पार्क धोरणाला मा. मुख्यमंत्र्यांनी अंतरिम स्थगिती दिली आहे, हे खरे काय,

(२) असल्यास त्याची कारणे काय आहेत,

(३) असल्यास, मुंबई महानगरपालिकेतर्फे पे अॅण्ड पार्क उभारण्याच्या योजनेची सद्य:स्थिती काय ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (०४-०८-२०१५) :** (१) हे खरे आहे.

(२) स्थानिक रहिवाशी संघटनांनी केलेला विरोध आणि स्थानिक लोकप्रतिनिधींनी केलेल्या विनंतीनुसार मुंबई महानगरपालिकेतर्फे 'ए' विभागात प्रायोगिक तत्वावर राबविण्यात येणाऱ्या नवीन पे अॅण्ड पार्क धोरणाला अंतरिम स्थगिती दिली आहे.

(३) बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या पूर्वीच्या धोरणानुसार पे अॅण्ड पार्क योजना राबविण्यात येत आहे.

---

### बाळासाहेब ठाकरे ट्रामा हॉस्पिटल येथे सिटीस्कॅन, एमआरआयची सोय उपलब्ध नसून डॉक्टरांची पदे रिक्त असल्याबाबत

**(१७) ११३४२ (०६-०४-२०१५). डॉ.भारती लव्हेकर (वर्सोवा) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) बाळासाहेब ठाकरे ट्रामा हॉस्पिटल येथे सिटीस्कॅन, एमआरआयची सोय उपलब्ध नाही, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, येथे डॉक्टरांची पदे भरलेली नाहीत, हे ही खरे आहे काय,
(३) तसेच स्टाफ नर्सेस व अन्य कर्मचाऱ्यांची संख्या अपुरी आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, हॉस्पिटलची सर्व पदे भरण्याबाबत शासन निर्णय घेणार आहे काय,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (०४-०८-२०१५) :** (१) हे खरे आहे.
(२) हिंदुहृदयसम्राट बाळासाहेब ठाकरे ट्रामा हॉस्पिटलमध्ये सायन रुग्णालय व वैद्यकीय महाविद्यालयामार्फत वैद्यकीय व निवासी वैद्यकीय अधिकाऱ्यांची नियुक्ती वेळोवेळी करण्यातयेते. सिटी स्कॅन सुविधेसाठी लागणाऱ्या मनुष्यवळाच्या अनुषंगाने बृहन्मुंबई महानगरपालिकेमार्फत पदनिर्मितीची कार्यवाही सुरु आहे.
(३) हे खरे नाही. सदर रुग्णालयात सध्या वैद्यकीय, निमवैद्यकीय, नर्सिंग, प्रशासकीय व कामगार अशी सर्व मिळून २९८ अनअनुसूचित पदे निर्माण करण्यात आलेली आहत. त्यापैकी २४५ पदे भरण्यात आली असून रिक्त पदे भरण्याबाबत कार्यवाही सुरु आहे.
(४) हॉस्पिटलची रिक्त पदे भरण्याबाबतची कार्यवाही बृहन्मुंबई महानगरपालिकेमार्फत सुरु आहे.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

## मुंबई उपनगरामध्ये हेल्थ पोस्ट व डिस्पेंन्सरी येथे डॉक्टरांची संख्या कमी असल्याबाबत

**(१८) ११३४४ (०६-०४-२०१५). डॉ.भारती लव्हेकर (वर्सोवा) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) मुंबई उपनगरामध्ये हेल्थ पोस्ट व डिस्पेंन्सरी येथे डॉक्टरांची संख्या कमी आहे व त्यांना एकापेक्षा जास्त ठिकाणचा चार्ज एकाच वेळेला दिला जातो, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, रिक्त पदे किती आहे व भरलेली पदांची संख्या किती आहे,
(३) असल्यास, त्यामुळे रुग्णांची गैरसोय होत आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, शासन रिक्त पदे भरण्याबाबत काही कार्यवाही करणार आहे काय,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (०४-०८-२०१५) :**(१) हे अंशत: खरे आहे.
(२) बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या दवाखान्यातील वैद्यकीय अधिकारी यांची एकूण १६८पदे असून त्यापैकी १६० पदे भरलेली आहेत व ०८ पदे रिक्त आहेत. तसेच आरोग्य केंद्रातील सहाय्यक वैद्यकीय अधिकारी यांची एकूण १८३ पदे रिक्त असून, त्यापैकी १५८ पदे भरलेली आहेत व २५ पदे रिक्त आहेत.
(३) हे खरे नाही.

(४) हेल्थ पोस्टमधील सहाय्यक वैद्यकीय अधिकारी या संवर्गाची रिक्त पदे भरण्याबाबतचा प्रस्ताव मंजुरीच्या अंतिम टप्प्यात असून, भरती प्रक्रियेद्वारे सदर रिक्त पदे बृहन्मुंबई महानगरपालिकेमार्फत लवकरच भरण्यात येतील तसेच दवाखान्यांमधील डॉक्टरांची रिक्त पदे भरण्याबाबतचा प्रस्ताव कार्यवाहीत आहे.

(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**अंशकालीन कर्मचा-यांच्या वयाची अट रद्द करण्याबाबत**

**(१९) ११५२२ (०६-०४-२०१५). श्री.अमित झनक (रिसोड) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) सुशिक्षीत बेरोजगारांना अर्थसहाय्य योजनेअंतर्गत शासनाने दिलेल्या आदेशाप्रमाणे रु.३००/ प्रती माह प्रमाणे ३ वर्षे पदवीधर अंशकालीन कर्मचाऱ्यांनी सेवा दिली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, वाढत्या वयामुळे अशा कर्मचाऱ्यांना शासकीय सेवेत सामावुन घेण्याबाबत वयाच्या अटीची अडचण येत आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, वयाची अट रद्द करण्याबाबत वाशिम जिल्हा पदवीधर अंशकालीन संघटना यांनी व स्थानिक लोकप्रतिनिधींनी दिनांक ८ ऑगस्ट, २०१४ रोजी वा त्यासुमारास शासनास निवेदन दिले होते, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (०४-०७-२०१५) :** (१) हे अंशत: खरे आहे. सुशिक्षित बेरोजगारांना अर्थसहाय्य या योजनेंतर्गत उमेदवारांनी दरमहा रु.३००/- मानधनावर ३ वर्ष किंवा त्यांना नोकरी लागेपर्यंत जे आधी घडेल तोपर्यंत शासकीय/निमशासकीय कार्यालयात दरमहा १५ दिवस, दररोज ४ तास याप्रमाणे जबाबदारीचे नसलेले काम पार पाडले आहे.

(२) सामान्य प्रशासन विभागाच्या शा.नि. दि.२७.१०.२००९ नुसार पदवीधर/पदविधारक अंशकालीन उमेदवारांची शासकीय/निमशासकीय सेवेतील नियुक्त्यामध्ये वाढीव उच्चत्तम वयोमर्यादा ४६ वर्ष आहे.

(३) होय.

(४) व (५) सदर बाब विचाराधीन आहे.

---

**जालना जिल्ह्यातील घनसावंगी, बदनापूर, मंठा या तालुक्याच्या ठिकाणच्या ग्रामपंचायतींना नगरपरिषदेचा दर्जा देण्याबाबत**

**(२०) ११५४१ (०६-०४-२०१५). श्री.राजेश टोपे (घनसावंगी), श्री.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा), श्री.अवधूत तटकरे (श्रीवर्धन), श्री.सुरेश लाड (कर्जत), श्री.रमेश कदम (मोहोळ) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) जालना जिल्ह्यातील घनसावंगी, बदनापूर, मंठा या तालुक्याच्या ठिकाणच्या ग्रामपंचायतींना नगरपरिषदेचा दर्जा देण्याची बाब शासनाच्या विचाराधीन आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, त्यानुसार शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (०८-०७-२०१५) :** (१), (२) व (३) जालना जिल्ह्यातील घनसावंगी व बदनापूर या तालुका मुख्यालयाच्या ठिकाणी नगरपंचायत स्थापन करण्याबाबत दि. ०४.०४.२०१५ रोजी आदेश निर्गमित करण्यात आले आहेत.

मंठा या तालुका मुख्यालयाच्या ठिकाणी नगरपंचायत स्थापन करण्याबाबत दि. ११.०६.२०१५ रोजी आदेश निर्गमित करण्यात आले आहेत.

---

**जालना नगरपालिका येथील अक्षय योजनेचे दोन हप्ते थकीत राहिल्याने महावितरणाने नगरपालिकेचा वीज पुरवठा पुन्हा खंडित केल्याबाबत**

**(२१) ११५५४ (०६-०४-२०१५). श्री.राजेश टोपे (घनसावंगी), श्री.रमेश कदम (मोहोळ), श्री.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा), श्री.अर्जुन खोतकर (जालना) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) जालना नगरपालिका येथील अक्षय योजनेचे दोन हप्ते थकीत राहिल्याने महावितरणाने नगरपालिकेचा वीज पुरवठा पुन्हा खंडित केल्याने शहरातील पथदिवे बंद असून नागरिकांची मोठ्या प्रमाणावर गैरसोय होत असल्याचे माहे जानेवारी, २०१५ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, शहरात एकूण १३०० पथदिवे असून त्यापैकी अनेक दिवे खराब झाल्याने बंद असून पथदिव्यांच्या वीज देयकापोटी थकबाकीची रक्कम १४ कोटींवर गेल्याने दोन वर्षापूर्वीपासून महावितरणाने पालिकेच्या पथदिव्यांचा वीज पुरवठा खंडित केला होता, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय, त्यात काय आढळून आले,

(४) असल्यास, सदर हप्ते थकीत राहण्याची कारणे काय आहेत,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (१०-०७-२०१५) :** (१) होय.

(२) होय.

(३) यासंदर्भात चोकशी करुन अहवाल सादर करण्याबाबत जिल्हाधिकारी, जालना यांना कळविण्यात आले आहे.

(४) जालना नगरपरिषदेच्या बिकट आर्थिक परिस्थितीमुळे हप्ते थकित राहिले आहेत.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

## बुलढाणा नगर परिषद अंतर्गत एकात्मिक झोपडपटटी निर्मूलन कार्यक्रमांतर्गत सुरु असलेल्या घरकुलाच्या कामाबाबत

**(२२) ११६२० (०७-०४-२०१५). श्री.हर्षवर्धन सपकाळ (बुलढाणा) :** सन्माननीय **गृहनिर्माण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) बुलढाणा नगर परिषद हद्दीत एकात्मिक झोपडपट्टी निर्मूलन कार्यक्रमाअंतर्गत घरकुल योजना मंजूर झाली होती, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, किती घरकुलास किती निधी प्राप्त झाला होता,

(३) असल्यास, सदर योजनेच्या अनुषंगाने किती घरकुलांचे काम पूर्ण झाले आहे व किती घरकुलांचे कामे अपूर्ण अथवा प्रलंबित आहे,

(४) असल्यास, योजनेतील अपूर्ण अथवा प्रलंबित कामास विलंब होण्याची कारणे काय आहेत,

(५) उपरोक्त योजना अपूर्ण असल्यास पूर्ण करण्याच्या अनुषंगाने शासनस्तरावर काय नियोजन केले आहे वा करण्यात येत आहे ?

**श्री. प्रकाश मेहता (१०-०७-२०१५) :** (१) होय. बुलढाणा नगर परिषदे अंतर्गत एकात्मिक गृहनिर्माण व झोपडपट्टी विकास कार्यक्रमांतर्गत फेज-१ व फेज-२ असे दोन प्रकल्प मंजूर आहेत.

(२) बुलढाणा नगर परिषदे अंतर्गत एकात्मिक गृहनिर्माण व झोपडपट्टी विकास कार्यक्रमांतर्गत फेज-१ मधील ८९२ घरकुलांसाठी रु. ११८१.०४ लक्ष व फेज-२ मधील १३९५ घरकुलांसाठी रु. ११९५.१५ लक्ष इतका निधी नगर परिषदेस प्राप्त झाला आहे.

(३) फेज-१ अंतर्गत ७६२ घरकुलांची बांधकाम पूर्ण झाले असून १३० घरकुलांचे काम प्रगतीपथावर आहे. फेज-२ अंतर्गत १९७ घरकुलांचे काम प्रगतीपथावर आहे.

(४) बांधकाम साहित्य घटक व मजुरी दरामध्ये वाढ, सुरुवातीस निविदांना प्रतिसाद न मिळणे, जागेची अडचण, कंत्राटदारांकडून कामे गतीने करण्यास अपेक्षित प्रतिसाद न मिळणे, इत्यादी कारणांमुळे कामास विलंब झाला आहे.

(५) जी कामे अपूर्ण आहेत ती प्राधान्याने पूर्ण करण्याचे नगर परिषदेने नियोजन केलेले आहे. तसेच केंद्र शासनाने आयएचएसडीपी योजनेतील मंजूर प्रकल्प पूर्ण करण्यासाठी मार्च, २०१७ पर्यंत मुदतवाढ दिली आहे.

---

**मागोठाणे, बोरिवली येथील काजूपाडा, मस्जिद विभाग व ऋषिवन परिसर तसेच हनुमान टेकडी, अशोकवन, देशमुख रेसीडेन्सी येथे पाणी पुरवठयाचे नियोजन करण्याबाबत**

**(२३) ११६७७ (०७-०४-२०१५). श्री.प्रकाश सुर्वे (मागाठाणे) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मागोठाणे, बोरिवली येथील काजूपाडा, मस्जिद विभाग व ऋषिवन परिसर तसेच हनुमान टेकडी, अशोकवन, देशमुख रेसीडेन्सी हा परिसर उंच टेकडयावर असल्यामुळे पाणी पुरवठयाचे पंपाद्वारे नियोजन करण्याबाबतचे निवेदन स्थानिक लोकप्रतिनिधींनी दिनांक ३ डिसेंबर, २०१४ रोजी वा त्या सुमारास मा.जलअभियंता, वरळी, मुंबई यांच्याकडे लेखी निवेदन दिले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या निवेदनानुसार पाणी पुरवठा करण्यासंदर्भात कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (०४-०८-२०१५) :** (१) हे खरे आहे.

(२) हनुमान टेकडी या उंचावरील परिसरास बृहन्मुंबई महानगरपालिकेतर्फे पूवीपासूनच शोषण टाकी व उदंचन संच व्यवस्था (पंपिंग स्टेशन) द्वारे पुरेशा दाबाने पाणी पुरवठा करण्यात येत आहे. तसेच अशोकवन, काजुपाडा, देशमुख रेसीडेन्सी, मस्जिद विभाग व ऋषिवन या परिसरांना पुरेशा गुरुत्वाकर्षण दाबाने पाणी पुरवठा करण्यात येत आहे. त्यापैकी मस्जिद विभाग व ऋषिवन हा भाग अति उंचावर असल्याने जलाशयाची पातळी कमी असल्यास या भागास कमी दाबाने पाणी पुरवठा होतो. अशा उंचावरील वस्तीला शोषण टाकी व उदंचन संच व्यवस्था (पंपिंग स्टेशन) द्वारे पाणी पुरवठा केला जातो. परंतु सदर भागातील लोकवस्ती अत्यंत दाटीची असल्यामुळे तेथे शोषण टाकी व उदंचन संच व्यवस्थेसाठी जागा उपलब्ध नाही. त्यामुळे थोड्या दूर अंतरावर असलेल्या बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या नागरी प्रशिक्षण संस्थेत या भागसाठी पंपिंग स्टेशन उभारण्याचे ठरविले आहे. शोषण टाकी व पंपिंग स्टेशनसाठी उपलब्ध असलेल्या जागेची पातळी, उंचावरील वस्तीची पातळी तसेच पाणी पुरवठ्याच्या जलवाहिनीतील दाब यांची पडताळणी करुन बृहन्मुंबई महानगरपालिकेतर्फे तांत्रिक प्रस्ताव तयार करण्यात येत आहे.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

**म्हाडाने सन २०१२ मध्ये काढलेल्या घराच्या सोडतीबाबत.**

**(२४) ११७१६ (०७-०४-२०१५). श्री.प्रशांत बंब (गंगापूर) :** सन्माननीय **गृहनिर्माण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) म्हाडाने सन २०१२ मध्ये काढलेल्या घराच्या सोडतीमध्ये १६५ लाभधारकांना ताबा देण्यात आला नसल्याची बाब दिनांक २८ जानेवारी, २०१५ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सोडतीमध्ये विजयी लाभधारक ठरलेल्या १६५ लाभधारकांना शासन केव्हा घरे देणार तसेच या प्रकरणी होत असलेल्या विलंबास जबाबदार असणाऱ्या अधिकारी यांचेवर कोणती कार्यवाही केली वा करणार आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. प्रकाश मेहता (१३-०७-२०१५) :** (१) व (२) महाराष्ट्र गृहनिर्माण व क्षेत्रविकास प्राधिकरणांतर्गत मुंबई मंडळातील ८४२ सदनिकांच्या मे, २०१२ मध्ये झालेल्या सोडतीत यशस्वी ठरलेल्या अर्जदारांना पात्रता निश्चितीपश्चात संकेत क्र. २८३ ते २८८ मधील ६७७ सदनिकांपैकी ५५३ सदनिकांचे वितरण करण्यात आले आहे.

बृहन्मुंबई महानगरपालिकेकडून सदनिका/इमारतींचे भोगवटा प्रमाणपत्र उशिरा प्राप्त झाल्याने संकेत क्रमांक २७४ ते २८२ मधील ११२ सदनिकांपैकी ९६ पात्र अर्जदारांना तात्पुरते देकारपत्र देण्यात आले आहे. तसेच संकेत क्र. २७३ एमएचपी पवई येथील ५३ सदनिकांपैकी ५१ अर्जदारांना तात्पुरते देकार पत्र देण्यात आले असून सदर इमारतींच्या भोगवटा प्रमाणपत्राकरिता म्हाडाकडून बृहन्मुंबई महानगरपालिकेकडे पाठपुरावा सुरु आहे.
(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

**मुंबई, कुर्ला येथील एलबीएस रोड, कुर्ला गार्डन येथे महानगरपालिकेच्या सफाई कामगारांच्या निवासस्थानाबाबत**

**(२५) ११७५७ (०७-०४-२०१५). श्री.संजय पोतनीस (कलिना) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) मुंबई, कुर्ला येथील एलबीएस रोड, कुर्ला गार्डन येथे महानगरपालिकेच्या सफाई कामगाराची निवासस्थाने असलेल्या ५ इमारतींना महानगरपालिकेकडून धोकादायक इमारत घोषित करुन तश्या प्रकारच्या नोटिसा सफाई कामगारांना माहे जानेवारी, २०१५ मध्ये पाठविण्यात आल्या आहेत, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उक्त सफाई कामगारांच्या पाच इमारतींमध्ये एकूण १३० सदनिका असून ह्या इमारतींची दुरुस्ती दिड वर्षापूर्वीच महानगरपालिकेकडून करण्यात आली होती, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, सदर इमारतींची दुरुस्ती महानगरपालिकेकडून दीड वर्षापूर्वीच करण्यात आली असतांनाही त्याच इमारतींना महानगरपालिकेने नुकतेच धोकादायक कोणत्या निकषाखाली घोषित केले याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय, त्यात काय आढळून आले आहे,
(४) तदनुसार यासंदर्भात शासन स्तरावर कोणती कार्यवाही करण्यात आली आहे वा येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (०४-०८-२०१५) :** (१) कुर्ला येथील एल.बी.एस. रोड कुर्ला गार्डन येथे इमारत क्रमांक ए,बी, सी, ई व एफ अशा एकूण ५ इमारती आहेत. सदर इमारतीपैकी ए, बी, ई व एफ या चार इमारतींचे महानगपालिकेच्या नोंदणीकृत संरचनात्मक सल्लागारांकडून संरचनात्मक परिक्षण करण्यात आले. इमारत क्रमांक 'सी' सुस्थितीत असल्याने सदर इमारतीचे संरचनात्मक परिक्षण करण्यात आलेली नाही. संरचनात्मक सल्लागारांच्या अहवालानुसार व महानगरपालिकेच्या तांत्रिक सल्लागार समितीच्या आदेशानुसार इमारत क्रमांक 'ई' ही इमारत धोकादायक घोषित करण्यात आलेली आहे. सबब सदर इमारतीध्ये राहणाऱ्या सदनिकाधारकांना इमारत रिकामी करुन माहूल येथे महानगरपालिकेकडे उपलब्ध असलेल्या पर्यायी निवासस्थानांमध्ये स्थलांतरीत होण्याकरिता माहे नोव्हेंबर २०१४ मध्ये नोटीसा बजावण्यात आलेल्या आहेत.

इमारत क्रमांक ए, बी व एफ या इमारतींच्या संरचनात्मक दुरुस्तीबाबत, सदर इमारती तात्काळ रिकाम्या करुन त्या निष्कासित कराव्यात तद्नंतर संपूर्ण भूखंडाच्या पुनर्विकास करावा असे आदेश महानगरपालिकेच्या तांत्रिक सल्लागार समितीच्या झालेल्या बैठकीनंतर पारित केले होते. त्यानुसार सदर इमारतीमध्ये राहणाऱ्या सदनिकाधारकांना इमारती रिकाम्या करण्याकरिता माहूल येथे महानगरपालिकडे उपलब्ध असलेल्या पर्यायी निवासस्थांनामध्ये स्थलांतरीत होण्याकरिता नोटीसा बजावण्यात येतील. सदरहू इमारती निष्कासित करुन आश्रय योजनेअंतर्गत या भुखंडाचा पुनर्विकास करुन सफाई कामगारांकरिता नव्याने निवासस्थाने बांधण्याचे प्रस्तावित आहे.

(२) हे खरे नाही.

(३), (४) व (५) प्रश्न उद्भवत नाही.

---

**गोरेगाव येथील दिनशा ट्रस्टच्या भूखंडावरील सुमारे ५०० झाडे तोडण्यात आल्याबाबत**

**(२६) ११८०९ (०६-०४-२०१५). श्रीमती मोनिका राजळे (शेवगांव - पाथर्डी) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) गोरेगाव येथील दिनशा ट्रस्टच्या भूखंडावरील महाराष्ट्र वृक्ष संवर्धन आणि जतन कायदा १९९५ या कायद्यांतर्गत परवानगी न घेता सुमारे ५०० झाडे तोडण्यात आली, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या प्रकरणी संबंधितांवर काय कारवाई करण्यात आली आहे,

(३) नसल्यास, शासन कारवाई करणार आहे काय ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (०४-०८-२०१५) :**(१) बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या पी/दक्षिण विभागतील इनऑर्बिट मॉलच्या पाठीमागे, रुस्तमजी टॉवर जवळील न.भु.क्र. १४०६ अ/२५ अ या मोकळ्या भूखंडावरील १२५-१५० सुबाभुळ या जातीची पावसाळ्यात वाढलेली झाडे महाराष्ट्र वृक्ष संवर्धन व जतन कायदा १९७५ मध्ये असलेल्या तरतुदीनुसार परवानगी न घेता तोडण्यात आली हे खरे आहे.

(२) व (३) सदर घटनास्थळाचा बांगूर नगर पोलीसांनी पंचनामा करुन, संबंधितांविरुध्द प्रथम खबरी अहवाल दाखल करण्यात आला आहे व सदर जागेवर चौकशी पूर्ण झाल्याशिवाय विकासकाला कुठल्याही प्रकारची बांधकाम परवानगी देऊ नये असे बृहन्मुंबई महानगरपालिकेने त्यांच्या उपप्रमुख अभियंता (इमारत प्रस्ताव) यांना कळविले आहे.

---

**मुंबईतील मालवणी, मालाड येथील नविन जिल्हाधिकारी कंपाऊंड वसाहती मध्ये पाणीपुरवठा होण्याबाबत**

**(२७) ११९७८ (०६-०४-२०१५). श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबईतील मालवणी, मालाड येथील नविन जिल्हाधिकारी कंपाऊंड वसाहतीत गेल्या ६ महिन्यापासून अनियमित व अपुरा तसेच दुर्गंधीयुक्त व दुषित पाण्याचा पुरवठा होत असल्याचे माहे ऑगस्ट, २०१४ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, पाणी पुरवठा सुस्थितीत व्हावा यासाठी ३६ इंच व्यासाची जलवाहिनी टाकण्यात यावी, अशी मागणी सहाय्यक आयुक्त, पी / उत्तर विभाग, सहाय्यक अभियंता (जलवाहिनी) व आयुक्त, बृहन्मुंबई महानगरपालिका यांच्याकडे दिनांक २६.४.२०१४, २.४.२०१४, १९.९.२०१४, २८.११.२०१४ व २०.११.२०१४ रोजी वा त्या सुमारास निवेदनाद्वारे मागणी करण्यात आली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी चौकशी करण्यात आली आहे काय, उक्त वसाहतीमध्ये स्वच्छ पाणी पुरवठा व सुरळीत करण्याबाबत शासनाकडून कोणती कार्यवाही करण्यात आली वा येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (०४-०८-२०१५) :** (१) हे अंशत: खरे आहे.

(२) हे खरे आहे.

(३) सदर वसाहतीमध्ये स्वच्छ व पुरेसा पाणी पुरवठा करण्यासठी या वसाहतीमधील स्थानिक स्तरावर प्राप्त झालेल्या दुषित पाण्याच्या तक्रारीचे निष्कासन महानगरपालिकेमार्फत वेळोवेळी करण्यात येते. तसेच या वसाहतीतील पाणी पुरवठ्यात सुधारणा करण्यासाठी, मालवणी झोन हा कांदिवली झोनपासून वेगळा केला आहे व पाणी पुरवठ्याच्या वेळेमध्ये वाढ केली आहे. त्यामुळे या वसाहतीमधील पाणी पुरवठ्यात वाढ झाली आहे. तसेच या वसाहतीमध्ये ९०० मि.मी. व्यासाची जलवाहिनी टाकण्याचे काम प्रगतीपथावर असून, त्यापैकी ३५० मीटर लांबीचे काम पूर्ण झालेले आहे व उर्वरित काम हे रोड विभागाशी संलग्नपणे करायचे आहे. हे काम झाल्यानंतर या वसाहतीमधील पाणी पुरवठ्यात आणखी सुधारणा होणे अपेक्षित आहे.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**मुंबई महानरगपालिकेने आवश्यक असलेल्या लोखंडी साहित्याची केलेल्या निर्मितीबाबत**

**(२८) ११९८५ (०७-०४-२०१५). श्री.आसिफ शेख (मालेगांव मध्य), श्री.पराग अळवणी (विलेपार्ले) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबई महानगरपालिकेने आपल्याला आवश्यक असलेल्या लोखंडी साहित्याची निर्मितीसाठी फांऊड्री कार्यशाळा, फोरस रोड जवळ मुंबई सेंट्रल, मुंबई येथील फाऊंड्रीतील ओत शाळेतील भट्टीमध्ये लोखंड वितळुन त्यापासून गटाराची लोखंडी झाकणे, स्मशानात चित्ता रचण्यासाठी पायसेट व अनेक सुटे भागाची निर्मिती करण्यात येते, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त कार्यशाळा महिन्यातून दोन वेळा चालविली जाते, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर कार्यशाळेतील कामगारांनी ८ रुपये गरमभत्ता देण्यात येत असून या तुटपुंज्या भत्त्यामुळे कामगार कार्यशाळा सोडून जातात, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, सदर प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व पुढे कोणती कार्यवाही करण्यात आली आहे वा येत आहे ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (०४-०८-२०१५) :**(१) होय, हे खरे आहे.

(२) हे खरे आहे.

(३) हे खरे नाही. बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या ओतशाळेतील सदर पदे ही स्थायी स्वरुपाची असून, कर्मचाऱ्यांच्या नियत वयोमानानुसार सेवानिवृत्ती अथवा पदोन्नती या कारणाने सदर पदे रिक्त होतात. सदर रिक्त पदावर सरळ सेवेतून कुशल कामागार प्राप्त होत नसल्यामुळे पदोन्नतीद्वारे ही पदे भरण्यात येत आहेत.

(४) सदर प्रकरणी चौकशी करण्यात आलेली नाही. तथापि सातव्या सुधारित वेतन श्रेणीत सदर उष्ण वातावरण कामकाज भत्याच्या दरामध्ये योग्य प्रमाणात सुधारणा करण्याविषयीचा प्रस्ताव महानगरपालिकेने संबंधित महापालिका वेतन सुधारणा कक्षाकडे पाठविला आहे.

---

**पुणे महापालिकेच्या वतीने गुणवंत १० वी, १२ वी च्या विद्यार्थ्यांना देण्यात येणाऱ्या शिष्यवृत्तीचे निकष बदलण्यात आल्याबाबत.**

**(२९) १२००६ (०६-०४-२०१५). श्री.भिमराव तापकीर (खडकवासला) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पुणे महापालिकेच्या वतीने गुणवंत १० वी १२ वी च्या विद्यार्थ्यांना देण्यात येणा-या शिष्यवृत्तीचे निकष बदलण्यात आले आहेत, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, शिष्यवृत्ती योजनेवर होणारा खर्च कमी करण्यासाठी शिष्यवृत्तीचे निकष बदलण्यात आले आहेत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, पुणे जिल्ह्यातील बहुसंख्य गरीब कुटुंबातील विद्यार्थ्यांना याचा फटका मोठ्या प्रमाणात बसणार असल्याने याची दखल घेऊन योजनेचे निकष न बदलता ते अधिक शिथिल करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (०४-०८-२०१५) :** (१) व (२) नाही.

पुणे महानगरपालिका हद्दीमध्ये राहणाऱ्या व इ. १० वी/ इ.१२ वी मध्ये खुल्या गटातील कमीत कमी ८०% गुण मिळविलेल्या विद्यार्थी व पुणे महानगरपालिकेच्या शाळेतील विद्यार्थी /रात्रशाळेतील विद्यार्थी / मागासवर्गीय विद्यार्थी यांनी किमान ७०% आणि ४०% अपंगत्व असलेल्यांनी किमान ६५% गुण मिळविले आहे. अशा विद्यार्थ्यांना अनुक्रमे भारतरत्न मौलाना अबुल कलाम आझाद योजना व लोकशाहीर अण्णाभाऊ साठे या योजनेत अनुक्रमे रुपये १५०००/- व रुपये २५०००/- पुढील शिक्षणासाठी पुणे महानगरपालिकेतर्फे अर्थसहाय्य देणेत येत आहे. तसेच या योजनेचे निकष बदलणेत आलेले नाही.
(३) प्रश्न उद्भवत नाही.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**येरवडा (जि.पुणे) येथील महापालिकेच्या इंग्रजी माध्यमाच्या शाळेत चौथी पर्यंतच्या वर्गात एकच शिक्षक असल्याबाबत**

**(३०) १२००८ (०६-०४-२०१५). श्री.भिमराव तापकीर (खडकवासला) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) येरवडा (जि.पुणे) येथील महापालिकेच्या इंग्रजी माध्यमाच्या शाळेत चौथी पर्यंतच्या वर्गात एकच शिक्षक आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, खडकवासला व सभोवतालच्या परिसरातील महापालिकेच्या तसेच खाजगी शाळांमध्ये शिक्षकांची संख्या अपुरी असून मागील तीन वर्षापासून शाळेला पूर्ण संख्येने शिक्षक नाहीत, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उपरोक्त शाळामध्ये शिक्षक भरती संदर्भात शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (०४-०८-२०१५) :** (१) येरवडा विभागात इंग्रजी माध्यमाच्या एकूण ३ शाळा असून, त्यापैकी १ ली ते चौथी पर्यंतच्या २ शाळा आहेत. त्यामध्ये अनुक्रमे १३९ च १३७ विद्यार्थी असून, प्रत्येक शाळेत २ शिक्षक आहेत.

(२) खडकवासला व सभोवतालच्या परिसरात महापालिकेची इंग्रजी माध्यमाची एकच शाळा असून सदर शाळेत इ. १ ली ते ७ वी पर्यंत वर्ग आहेत. सदर शाळेचा एकूण पट ३४० इतका आहे. व सदर शाळेत मुख्याध्यापकासह आठ शिक्षक कार्यरत आहेत.

(३) पुणे महानगपालिकेतर्फे इंग्रजी माध्यमासाठी शिक्षक भरतीची प्रक्रिया सुरु करण्यात येत आहे.

(४) प्रश्नच उद्‌भवत नाही.

---

**पुणे महानगरपालिकेच्या २०१५ च्या अंदाजपत्रकात आर्थिक दुर्बल घटकांतील मुलांसाठी समुपदेशन वर्गासाठी निधीची तरतूद करण्याबाबत**

**(३१) १२०२१ (०८-०४-२०१५). श्री.भिमराव तापकीर (खडकवासला), श्री.योगेश टिळेकर (हडपसर), श्री.जगदीश मुळीक (वडगाव शेरी) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पुणे महानगरपालिकेच्या सन २०१५ च्या अंदाजपत्रकात गेल्या ६ वर्षापासून कार्यान्वित असलेल्या आर्थिक दुर्बल घटकांतील मुलांसाठी समुपदेशन वर्गासाठी निधीची तरतुद करण्यात आलेली नाही, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, मागील शैक्षणिक वर्षात ८० हजार विद्यार्थ्यांचे समुपदेशन करण्यात आले असून यावर्षी निधीची तरतूद केली नसल्याने पुढील शैक्षणिक वर्षापासून सदर समुपदेशन वर्ग बंद होणार आहेत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय, तद्नुषंगाने निधीची तरतूद बंद करण्याची कारणे काय आहेत,

(४) सदर निधीची तरतूद करुन समुपदेशन वर्ग सुरु करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (१०-०८-२०१५) :** (१) पुणे महानगरपालिकेकडील प्राथमिक शाळांमधील विद्यार्थ्यांना सामाजिक व घरगुती कारणांमुळे मागे पडणाऱ्या विद्यार्थ्यांच्या व्यक्तिमत्व विकास मार्गदर्शक समुपदेशन करणेसाठी सदरचा उपक्रम सन २००९ पासून राबविणेस सुरुवात केली. त्यावेळी शिक्षण मंडळ पुणे महानगरपालिका ही स्वायत्त संस्था होती व त्यांचे अंदाजपत्रक सन २०१४-१५ पर्यंत स्वतंत्ररित्या मंजूर करण्यात येत होते. अंदाजपत्रकामध्ये समुपदेशनाकरिता स्वतंत्र तरतूद करण्यात येत होती.

(२), (३) व (४) सन २०१३-१४ मध्ये व्यक्तिविकास प्रबोधीनी या संस्थेमार्फत २०४०८ विद्यार्थ्यांचे वैयक्तिक समुपदेशन व ६०००० विद्यार्थ्यांचे गट समुपदेशन करण्यात आले आहे.

शिक्षण मंडळाचे सन २०१५-१६ चे अंदाजपत्रक हे स्वतंत्ररित्या तयार न करता पुणे महानगरपालिकेच्या अंजदापत्रकामध्ये सदरचे अंदाजपत्रक समाविष्ठ करण्यात आलेले आहे. तसेच समान विषय असलेले अर्थसंकल्पिय तरतूदी एकत्रित करण्यात आलेल्या आहेत.

सन २०१५-१६ चे अंदाजपत्रकामध्ये शैक्षणिक उपक्रम या अर्थशिर्षकाअंतर्गत तरतूद करण्यात आलेली आहे. विद्यार्थ्यांची होणारी प्रशिक्षणे व इतर उपक्रमाकरिता तरतूद करण्यात आलेली आहे.

---

**पिंपरी-चिंचवड महानगरपालिकेच्या बिजलीनगर रुग्णालयात वैद्यकीय अधिकाऱ्याकडून विनयभंग झाल्याबाबत**

**(३२) १२१६४ (०८-०४-२०१५). श्री.ओमप्रकाश ऊर्फ बच्चू कडू (अचलपूर) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पिंपरी-चिंचवड महानगरपालिकेच्या बिजलीनगर रुग्णालयात वैद्यकीय अधिकाऱ्याकडुन विनयभंग झाल्याची तक्रार करुनही दखल न घेता पिडीत महिलेस कामावरुन कमी केल्याचा त्रास, सततचा विनयभंग आणि छेडछाड असहाय्य झाल्याने सदर महिलेने दिनांक २६ जानेवारी २०१५ रोजी ध्वजवंदना दरम्यान महानगरपालिकेच्या मुख्य प्रशासकीय इमारतीसमोर आत्मदहनाचा प्रयत्न केला होता, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर प्रकरणी शासनाने दोषींवर कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) असल्यास, शासन या अपंग विधवा महिलेवरील अन्याय दुर करुन महानगरपालिका सेवेत सामावुन घेण्याबाबत कोणती कारवाई करणार आहे वा करीत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (१०-०८-२०१५) :** (१) बिजलीनगर दवाखान्यातील महिलेने दाखल केलेल्या विनयभंगाच्या तक्रारीबाबत महिला तक्रार निवारण समिती मार्फत चौकशी करणेत आलेली असून न्यायालयीन आदेशाचे अनुषंगाने सदर महिला कर्मचाऱ्यास कामावरुन कमी करणेत आलेले आहे. तथापि दिनांक २६ जानेवारी, २०१५ रोजी ध्वजवंदना दरम्यान महानगरपालिकेच्या मुख्य प्रशासकीय इमारतीसमोर आत्मदहनाचा प्रयत्न केला होता हे खरे आहे.

(२) श्रीमती बलकवडे यांचे विनयभंग व छेडछाड प्रकरणी महानगरपालिका स्तरावर महिला तक्रार निवारण समितीमार्फत चौकशी करुन सुनावणी घेण्यात आली. या सुनावणीमध्ये दोषीवर कोणतेही आरोप सिध्द न झाल्याने कारवाई करण्यात आलेली नाही. तसेच, ध्वजदिनाचे दिवशी श्रीमती बलकवडे यांनी आत्मदहनाचा प्रयत्न केल्याने त्यांचेवर पिंपरी पोलीस स्टेशन येथे भा.द.वि. कलम ३०९ नुसार एफआयआर क्र.५६/१५, दिनांक २६.१.२०१५ दाखल करण्यात आलेली आहे.

(३) मे.औद्योगिक न्यायालय, पुणे यांचेकडील दिनांक २१.७.२०१४ रोजीचे निर्णयानुसार श्रीमती बलकवडे यांची ६-६ महिने कालावधीची मानधनावरील सेवा दिनांक २१.११.२०१४ रोजी समाप्त करण्यात आली असून, त्यांना पुन्हा महानगरपालिका सेवेत सामावुन घेणेकरिता महानगरनपालिकेने जाहिरात प्रसिध्द केल्यानंतर विहित कार्यपध्दतीनुसार अर्ज करणे, मुलाखत देणे व त्यानंतर गुणानुक्रमणे पत्र होणे इ. विहित कार्यपध्दती अवलंबिणे आवश्यक आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**मुंबईतील कुर्ला एलबीएस मार्ग, शीव धारावी, घाटकोपर, साकीनाका, अंधेरी, कलिना सांताक्रूझ माहिम अशा विविध ठिकाणी रस्त्यांवर खोदकामे केल्याबाबत**

**(३३) १२२०० (०८-०४-२०१५). श्री.संजय पोतनीस (कलिना) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबईतील कुर्ला एलबीएस मार्ग, शीव धारावी, घाटकोपर, साकीनाका, अंधेरी, कलिना सांताक्रूझ, माहिम अशा विविध ठिकाणी महानगरपालिका, बेस्ट महानगर गॅसची पाईपलाईन, भूमिगत विद्युत वाहिन्य टाकणे, रिलायन्स एनर्जी, टाटा पॉवर यांसारख्या विकास कामांच्या नावाखाली रस्त्यांवर खोदकामे सुरू असल्याचे माहे जानेवारी, २०१५ मध्ये वा त्या सुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, विकास कामे सुरू असल्यामुळे ठिकठिकाणी रस्ते व पदपथ खोदून ठेवण्यात आल्यामुळे प्रवाशांना प्रवास करताना जीव मुठीत घेऊन प्रवास करावा लागत आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, याबाबत शासनाने पाहणी/चौकशी केली आहे काय, त्यात काय आढळून आले, तदनुसार सदर खोदकामे करणाऱ्या दोषींवर कोणती कारवाई करण्यात आली आहे वा येत आहे,

(४) तसेच सदर रस्ते तात्काळ दुरूस्त करण्याबाबत शासन स्तरावर कोणती कार्यवाही करण्यात आली आहे वा येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (०४-०८-२०१५) :** (१) हे खरे आहे.

(२) हे खरे नाही.

(३) व (४) पावसाळा संपल्यानंतर ऑक्टोबर महिन्यापासून बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या संबंधित विभाग कार्यालयाकडून रस्ते व पदपथांच्या खोदकामासाठी परवानगी देण्यात येते व माहे १५ मे पर्यंत सदर चरांची पुनर्भरणी संबंधित विभाग कार्यालयामार्फत करण्यात येऊन पदपथ व रस्ते पूर्ववत करुन नागरिकांच्या वापरासाठी खुले करण्यात येतात.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

**कुरेशी नगर, कुर्ला, मुंबई येथील दफनभूमित प्रेतयात्रा नेण्याकरीता पादचारी पूलाबाबत.**

**(३४) १२२०६ (०७-०४-२०१५). श्री.मंगेश कुडाळकर (कुर्ला) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) कुरेशी नगर, कुर्ला, मुंबई येथील दफनभूमित प्रेतयात्रा नेण्याकरीता पादचारी पूल नसल्यामुळे मुस्लीम बांधव प्रेतयात्रा काढण्याकरीता कुर्ला रेल्वेस्थानक पुल, फलाट क्र. ७/८ व पटरी यांचा वापर करतात, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, कुर्ला (पू) बस आगाराकडून तक्षशिला मार्गे कुरेशी नगर येथे उतरणाऱ्या पादचारी पुल नसल्यामुळे रेल्वे स्थानकाचा वापर करावा लागत असल्याने पादचारी पुलाकरिता स्थानिक रहिवाशी व लोकप्रतिनिधी यांनी वारंवार संबंधित अधिकाऱ्यांबरोबर पत्रव्यवहार केला आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, पादचारी पुल बांधण्याकरीता शासनाने कोणती कार्यवाही केली आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (०४-०८-२०१५) :** (१) व (२) हे खरे आहे.

(३) व (४) सदर पादचारी पुलाच्या बांधकामास लागणारी जागा ही रेल्वे प्रशासनाच्या अखत्यारीत येत असल्यामुळे प्रस्तावित पूल रेल्वे प्रशासनाने बांधणे अपेक्षित आहे. सदर ठिकाणी पादचारी पूल बांधण्यासाठी रेल्वे प्रशासनास बृहन्मुंबई महानगरपालिकेमार्फत दिनांक २८.५.२०१५ रोजीच्या पत्रान्वये कळविण्यात आले आहे. परंतु सदर ठिकाणी रेल्वे लाईनच्या बी.ई.एस.टी. डेपोकडील बाजूची बांधकामे बाधित होत असल्यामुळे पादचारी पूल बांधणे शक्य झाले नाही. सदर बाधित बांधकामे ही रेल्वेच्या हद्दीत असल्यामुळे त्याचे निष्कासन रेल्वे प्रशासनाने करणे अपेक्षित आहे. त्यासाठी महापालिकेमार्फत रेल्वे प्रशासनाकडे पाठपुरावा करण्यात येत आहे.

---

## पिंपरी महानगरपालिका (जि.पुणे) हद्दीतील चिखली-कुंदळवाडी परिसरातून सांडपाणी पुनर्वापर योजनअंतर्गत चिखली भागात गटारांच्या पाईपलाईनबाबत

**(३५) १२३०२ (०७-०४-२०१५). श्री.सुरेश गोरे (खेड आळंदी) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पिंपरी महानगरपालिका (जि.पुणे) हद्दीतील चिखली-कुंदळवाडी परिसरातून सांडपाणी पुनर्वापर योजनअंतर्गत चिखली भागात गटारांच्या पाईपलाईन या योजनेला न जोडल्याने ते सांडपाणी इंद्रायणीत मिसळत असल्याने माहे जानेवारी, २०१५ च्या सुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या मुळे आळंदीकरांना दुषित पाणी प्यावे लागत असल्याने त्याच्या आरोग्यास धोका निर्माण झाला आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, या संदर्भात शासनाने चौकशी केली आहे काय, त्यानुसार सदरचे सांडपाणी प्रकिया करुन सोडण्यासंदर्भात कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे **?**

**श्री. देवेंद्र फडणवीस (०४-०८-२०१५) :** (१), (२) व (३) पिंपरी-चिंचवड महानगरपालिकेने देहू आळंदी रस्त्यालगत कुंदळवाडी येथे नाल्याचे पाणी अडवून व मध्ये जाळी टाकून महानगरपालिकेच्या मलनि:सारण वाहीनीला जोडलेले आहे. सदर सांडपाणी पुढे चऱ्होली मलशुध्दीकरण केंद्रामध्ये जमा होते व तेथे शुध्दीकरणाची प्रक्रिया केल्यानंतर पुन्हा इंद्रायणी

नदीमध्ये सोडण्यात येते. अशा प्रकारे चिखली कुंदळवाडी नाल्यातील ५ ते ७ द.ल.लिटर सांडपाणी महानगरपालिकेच्या मलनि:सारण व्यवस्थेमध्ये घेऊन प्रक्रिया करण्यात येते आहे. यामुळे इंद्रायणी नदीचे प्रदुषण कमी होण्यास मदत झालेली आहे.

तसेच पिंपरी-चिंचवड महानगरपालिकेने इंद्रायणी नदीच्या कडेने महापालिका हद्दीमध्ये मलनि:सारण नलिका टाकून या परिसरातील सांडपाणी चऱ्होली येथील मलशुध्दीकरण केंद्रामध्ये प्रक्रियाकामी नेण्यात येते. या मलशुध्दीकरण केंद्रामध्ये दररोज सुमारे २३ ते २५ द.ल.लि. पाणी प्रक्रिया करण्यात येऊन शुध्द केलेले पाणी इंद्रायणी नदीत सोडण्यात येत आहे.

जिल्हाधिकारी, पुणे यांनी दिनांक ९ जानेवारी, २०१५ रोजी महापालिकेने केलेल्या कामाची प्रत्यक्ष जागा पहाणी केली आहे.

---

## पुष्पा पार्क, मालाड (पूर्व) येथे आग लागल्याबाबत

**(३६) १२६१४ (०८-०४-२०१५). श्री.अतुल भातखळकर (कांदिवली पूर्व) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पश्चिम द्रुतगती मार्गावर पुष्पा पार्क, मालाड (पूर्व) येथे ओंकार विकासकामार्फत बांधकामाचे काम चालू असतांना मध्यरात्री आग लागल्याचे माहे जानेवारी, २०१५ मध्ये वा त्या सुमारास निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर प्रकरणाची चौकशी करण्यात आली आहे काय,

(३) असल्यास, मुंबईमध्ये संध्याकाळी ७ नंतर कोणतीही बांधकामाचे काम न करण्याचे बंधनकारक आहे, हे खरे आहे काय,

(४) असल्यास, असे असतानाही मुंबईमध्ये अनेक ठिकाणी रात्रभर बिल्डींग बांधकामाचे काम सुरु असल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(५) असल्यास, सदर प्रकरणी शासनाने कोणता निर्णय घेतला आहे व सदर विकासकावर कोणती कारवाई करण्यात आली वा येत आहे,

(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (०४-०८-२०१५) :** (१) पुष्पा पार्क, मालाड (पूर्व) येथे ओंकार विकासकामार्फत बांधकाम चालू असलेल्या इमारतीत दिनांक १७.१.२०१५ रोजी मध्यरात्री आग लागली हे खरे आहे परंतु आग लागली त्यावेळी कुठलेही बांधकाम करण्याचे काम चालू नव्हते.

(२) होय. सदर आगीच्या कारणांची चौकशी करण्यातआली होती. सदर आग ही आकाश कंदिलामध्ये प्रज्वलित केलेला दिवा सुरक्षा जाळीमध्ये अडकल्यामुळे लागली होती असा निष्कर्ष आहे.

(३) हे खरे आहे. मुंबई महानगरपालिकेमार्फत मंजूर करण्यात येणाऱ्या इमारत प्रस्तावामध्ये सुर्योदयापूर्वी व सूर्योदयानंतर बांधकाम न करण्यासंबंधिची अट अंतर्भूत करण्यात येते.

(४) हे खरे नाही.

(५) व (६) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**मुंबई, सांताक्रुझ पूर्व येथील कलिना - कुर्ला रोडवर एका खाजगी प्रकल्पाला ५० झाडांचा अडथळा येत असल्याबाबत**

**(३७) १३०३५ (०७-०४-२०१५). ॲड.वारीस पठाण (भायखळा) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) सांताक्रुझ पूर्व (मुंबई) येथील कलिना - कुर्ला रोडवर एका खाजगी प्रकल्पाला ५० झाडांचा अडथळा येत असल्याने ही झाडे कापण्याची मागणी एका बिल्डरने पालिकेकडे केल्याने पालिकेच्या अधिकाऱ्यांनी पाहणी केल्यानंतर फक्त १२ झाडे प्रकल्पाआड येत असल्याचे आढळून आल्याने १२ झाडे तोडण्याची परवानगी देण्यात आली, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर प्रकरणी वृक्ष संवर्धन कायदा व संबंधित कायद्यांतील तरतूदीचे उल्लंघन झाल्याने निष्पन्न झाले, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर प्रकरणी संबंधितांवर कोणती कारवाई करण्यात आली वा प्रस्तावित आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (०४-०८-२०१५) :** (१) हे खरे नाही. तथापि, सांताक्रुझ (पूर्व) येथील कलिना-कुर्ला रोडवरील कोलेकल्याण गावचा न भु.क्र. ५९८३/ब/१ धारण करणाऱ्या भूभागावर अस्तित्वात असलेल्या १२ झाडांपैकी नियोजित बांधकामात / वाहतुकीस अडथळा करणारी ४ झाडे कापण्यास व ४ झाडे पुनर्रोपित करण्यास वृक्ष प्राधिकरणामार्फत परवानगी देण्यात आली आहे.

(२) हे खरे नाही.

(३) व (४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**शासनाने लागू केलेल्या स्थानिक संस्था कराबाबत**

**(३८) १३०७९ (०८-०४-२०१५). श्री.चंद्रदीप नरके (करवीर) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) शासनाने लागू केलेल्या स्थानिक संस्था कर (एल.बी.टी.) च्या विरोधात राज्यातील सर्व 'ड' वर्ग महापालिका क्षेत्रातील व्यापा-यांनी दिनांक ३० जून, २०११ रोजी बंद पुकारला होता, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, शासनास स्थानिक कराऐवजी एक टक्का स्टॅम्प ड्युटीतून आणि एक टक्का डिक्लेअर्ड गुडसच्या व्हॅटमध्ये वाढ करुनही शासनाने पुन्हा स्थानिक कर सुरु ठेवला आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, या पर्यायातून मिळणा-या उत्पन्नातून महापालिकांना अनुदान देऊन स्थानिक संस्था कर विनापर्याय रद्द करणेबाबत शासन कार्यवाही करणार आहे काय ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (०४-०८-२०१५) :**(१) होय.

(२) नाही.

(३) मा.वित्त मंत्री यांनी सन २०१५ च्या अर्थसंकल्पिय अधिवेशनात दि. १ ऑगस्ट, २०१५ पासून स्थानिक संस्था कर रद्द करण्याची घोषणा केली आहे. या अनुषंगाने कार्यवाही सुरु आहे.

---

## लातूर जिल्हयातील जिल्हा परिषद लातूर अंतर्गत इतर जिल्हा मार्ग व ग्रामीण रस्त्यांच्या दुरुस्तीबाबत

**(३९) १३२७१ (१०-०४-२०१५). श्री.त्र्यंबकराव भिसे (लातूर ग्रामीण) :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) लातूर जिल्हयातील जिल्हा परिषद लातूर अंतर्गत इतर जिल्हा मार्ग व ग्रामीण रस्त्यांची लांबी जवळपास ३८८६ कि.मी. असून त्यापैकी २५७३ कि.मी.चे रस्ते अत्यंत खराब झाले असून वाहतूकीस गैरसोयीचे झाल्याचे माहे फेब्रुवारी, २०१४ मध्ये वा त्यासुमारास निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर अत्यंत खराब लांबीचे रस्ते दुरुस्त करण्याबाबत तसेच दुरुस्तीसाठी किती निधीची आवश्यकता असून निधी मंजूरीबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) सदर अत्यंत खराब झालेले रस्ते तातडीने दुरुस्ती करण्याबाबत शासनास किती कालावधी लागणार आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्रीमती पंकजा मुंडे (१७-०७-२०१५) :** (१) अंशत: खरे आहे,

(२) व (३) लातूर जिल्हा परिषदेअंतर्गत ग्रामीण मार्ग व इतर जिल्हा मार्ग रस्त्यांची एकूण लांबी ४९६२.१० कि.मी. इतकी असून अस्तित्वातील लांबी ३८८६.२० कि.मी इतकी आहे, दुरुस्तीसाठी शासनाकडे उपलब्ध असलेल्या निधीचे वाटप रस्त्याच्या लांबीच्या प्रमाणात करण्यात येते, त्यानुसार रस्ते व पूल, दुरुस्ती व परिरक्षण या कार्यक्रमा अंतर्गत सन २०१३-१४ व २०१४-२०१५ या आर्थिक वर्षासाठी लातूर जिल्हा परिषदेस रु. ९७१.६६ लक्ष, तेराव्या वित्त आयोगामध्ये सन २०१३-१४ व २०१४-१५ मध्ये रु. ३२४.८५ लक्ष तर पूरहानी कार्यक्रमासाठी लातूर जिल्हा परिषदेला सन २०१३-१४ मध्ये रु. ११२४.०० लक्ष असा एकूण रु. २४२०.५१ लक्ष इतका निधी उपलब्ध करुन देण्यात आलेला आहे,

जिल्हा परिषदेला सन २०१४-१५ मध्ये रस्ते दुरुस्तीसाठी विविध योजनांमधून प्राप्त निधीमधुन सुमारे २००.०० कि.मी. रस्त्यांची लांबी दुरुस्त करण्यात आलेली आहे, अत्यंत खराब झालेली लांबीतील रस्त्याची दुरुस्ती जिल्हा परिषदेला विविध योजनांमधून प्राप्त निधी व निकषाच्या अधिन राहून टप्प्या-टप्प्याने करण्याचे जिल्हा परिषदेचे नियोजन आहे,

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**नाशिक महानगरपालिका अंतर्गत जवाहरलाल नेहरु पुनरोत्थान घरकुल योजना राबविण्याबाबत**

**(४०) १५०३१ (०७-०४-२०१५). श्रीमती देवयानी फरांदे (नाशिक मध्य) :** सन्माननीय **गृहनिर्माण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नाशिक महानगरपालिका अंतर्गत जवाहरलाल नेहरु पुनरोत्थान घरकुल योजना राबविण्यात येत आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या योजनेंतर्गत नाशिक शहरात पंचवटी, सिडको, सातपुर व अन्य काही भागात एकुण ७४६० घरकुलांची उभारणी करण्यात आली आहे, हे खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त घरकुलांपैकी फक्त ९६५ कुटुंबानाच या योजनेचा लाभ मिळाला आहे, तसेच उर्वरित घरकुलांची सद्यस्थिती परिस्थीती अत्यंत दयनीय आहे, हे खरे आहे काय,

(४) असल्यास, या योजनेचा लाभ मिळण्यासाठी नागरिकांनी मोठ्या प्रमाणावर महानगरपालिकेकडे विहित नमुन्यात अर्ज व योग्य त्या कागदपत्रांची पडताळणी करुन ही अनेक नागरिक या योजनेपासून वंचित आहेत, हे खरे आहे काय,

(५) असल्यास, या योजनेवर महानगरपालिकेचा कोट्यावधी रुपयांचा झालेला खर्च वाया गेला, हे खरे आहे काय,

(६) असल्यास, याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे ?

**श्री. प्रकाश मेहता (१०-०७-२०१५) :** (१), (२) व (३) जवाहरलाल नेहरु राष्ट्रीय नागरी पुनरुत्थान कार्यक्रमांतर्गत शहरी गरीबांना मुलभूत सुविधा पुरविणे या योजने अंतर्गत नाशिक महानगरपालिके अंतर्गत एकुण ११२०० घरकुलांच्या प्रकल्पास केंद्र शासनाने मान्यता दिली होती. तथापि, सुधारित प्रकल्प अहवालानुसार ३७४० घरकुले सिमित करण्यात येऊन ७४६० घरांचे अंतिम उद्दीष्ट निश्चित करण्यात आले. त्यापैकी ३१०० घरकुलांचे काम पुर्ण झालेले असून २४९६ लाभार्थ्यांना घरकुलाचे वाटप करण्यात आले आहे व यापैकी १४२० लाभार्थी घरकुलांमध्ये प्रत्यक्ष वास्तव्य करीत आहेत. तसेच ६०४ घरकुलांसाठी लाभार्थ्यांची सोडत काढण्याचे काम कार्यवाहीत आहे.

उर्वरित ४३६० घरकुलांचे काम प्रगतीपथावर आहे.

(४) सदर योजनेचा मुळ उद्देश हा संपुर्ण झोपडपट्टीचे उच्चाटन करुन पुनर्वसन करणे हा असल्याने त्या त्या झोपडट्टीमधील झोपडीधारकांच्या संमतीने लाभार्थी म्हणून समावेश होतो. अशा झोपडपट्टीचे उच्चाटन झाल्यानंतर संपुर्ण झोपडपट्टीची जागा शासकीय, मनपा, भुखंडावरील जागा रिकाम्या झालेल्या आहेत किंवा झोपडपट्टीची जागा तात्पुरत्या स्वरुपात ट्रान्झीट कॅम्प मध्ये स्थलांतरीत करुन त्याच जागेवरती घरकुलांची उभारणी करण्यात आलेली आहे, म्हणून झोपडपट्टीतील इतर सहभागी न होणाऱ्या झोपडीधारकांच्या व्यतिरिक्त इतर झोपडीधारकांनी केलेले अर्ज लाभार्थी म्हणून घेता येत नाहीत.

(५) हे खरे नाही.

(६) प्रश्न उद्भवत नाही.

---

### मुंबईतील खाजगी ट्रस्टच्या जागेवर एसआरए योजना राबविण्याबाबत

**(४१) १६२७२ (१९-०५-२०१५). श्री.राधाकृष्ण विखे-पाटील (शिर्डी) :** सन्माननीय **गृहनिर्माण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबईतील खाजगी ट्रस्टच्या जागेवर वसलेल्या झोपडपट्टीच्या पुनर्वसनासाठी जमीन मालक असलेल्या ट्रस्टनी एसआरए योजना राबवावी असे शासनाने माहे जानेवारी, २०१५ मध्ये वा त्या सुमारास ट्रस्टना नोटीस पाठवून तीन महिन्याची मुदत दिली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, मुंबईत ज्या ट्रस्टच्या नावे जमिनी आहेत त्यांची नावे व त्यांचेकडे असलेल्या जमिनीचे क्षेत्र किती आहे व त्यातून किती घरांची निर्मिती होणार आहे,

(३) असल्यास, सदर योजना ट्रस्टनी मान्य केली नाही तर सदर ट्रस्टवर शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत, सदर योजनेचे थोडक्यात स्वरुप काय आहे ?

**श्री. प्रकाश मेहता (१०-०७-२०१५) :** (१) या संदर्भात झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरणाने दिनांक १६.६.२०१५ रोजी संबंधितांना नोटीस दिली आहे.

(२) व (३) या संदर्भात झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरणाने दिनांक १६/०६/२०१५ रोजी बृहन्मुंबईतील बैरामजी जिजाभाय प्रा.लि., अे.एच.वाडीया चॅरीटेबल ट्रस्ट, एफ.ई.दिनशॉ ट्रस्ट, गोदरेज ॲन्ड बॉयस मॅन्यूफुक्चरींग कंपनी लिमिटेड, वाडीया चॅरिटेबल ट्रस्ट, एच.के.नानवाणी व श्री. सर प्रतापसिंग मथूरादास या जमिनधारकांना नोटीसा दिलेल्या आहेत. ही सर्व कार्यवाही प्राथमिक टप्प्यात असल्याने गृहनिर्माणसाठी उपलबध होऊ शकणारे क्षेत्र निश्चित झाल्याखेरीज घरांच्या संख्येचा अंदाज देता येणार नाही.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

### यवतमाळ व उस्मानाबाद जिल्हयातील शेतकरी जन-धन योजनेपासुन वंचित असल्याबाबत

**(४२) २६०६८ (१९-०८-२०१५). डॉ.मिलिंद माने (नागपूर उत्तर) :** सन्माननीय **नियोजन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) विदर्भातील यवतमाळ व मराठवाड्यातील उस्मानाबाद या जिल्हयातील ४० टक्के शेतकरी जन-धन योजनेपासुन वंचित आहेत, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, २२ लक्ष लोकसंख्या असलेले जिल्हयातील १६ तालुक्यामध्ये शेतकऱ्यांचे जन-धन योजनेचे झिरो शिल्लकीवर खाते उघडण्यात आले नाही, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, बँकामध्ये खाती उघडण्यास गेलेल्या शेतकऱ्यांना बँक अधिकाऱ्यांकडून कागदपत्राची पुर्तता करण्याची मागणी केली जात आहे, हे ही खरे आहे काय,

(४) तसेच उक्त प्रकरणी संबंधित अधिकाऱ्यांवर शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. सुधीर मुनगंटीवार (०५-१२-२०१५) :**(१) व (२) हे खरे नाही.
यवतमाळ जिल्ह्यात जनधन योजनेंतर्गत ४,५१,१७९ खाती उघडण्यात आली असून दिनांक २६.१२.२०१४ रोजी जिल्हा संपृक्त (Saturated) जाहीर करण्यात आला आहे. तसेच, उस्मानाबाद जिल्ह्यात जनधन योजनेंतर्गत ३,५८,१४९ खाती उघडण्यात आली असून दिनांक १३/०१/२०१५ रोजी जिल्हा संपृक्त जाहीर करण्यात आला आहे.
(३) बँक खाती उघडताना भारतीय रिझर्व बँकेच्या आपला खातेदार जाणा (KYC Norms)/ आपला खातेदार जाणा (Relaxed KYC Norms) आदेशाप्रमाणे आवश्यक तेवढीच कागदपत्रे घेतली जातात.
(४) व (५) प्रश्न उद्भवत नाही.

---

### वर्धा जिल्ह्यातील कारंजे (घाटगे) तालुक्यातील मौजे खैरी या गावांजवळ असलेल्या कार नदी प्रकल्पाचे काम अपूर्णावस्थेत असल्याबाबत

**(४३) २६९०५ (१७-०८-२०१५). डॉ.आशिष देशमुख (काटोल) :** सन्माननीय **जलसंपदा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) वर्धा जिल्ह्यातील कारंजे (घाटगे) तालुक्यातील मौजे खैरी या गावांजवळ असलेल्या कार नदी प्रकल्पाला सन १९८० मध्ये प्रशासकीय मान्यता मिळाल्यानंतर सन २००१-०२ पासून सन २०१३-१४ पर्यंत ६७४४ हेक्टर सिंचन क्षमतेपैकी अंदाजे १२८६.०० हेक्टर सिंचन क्षमता पूर्ण करण्यात आली, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर प्रकल्पाचे सन २०१५ पर्यंत केवळ ८० टक्केच काम पूर्ण होऊन २० टक्के काम अद्यापी प्रलंबित आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, सदरहू प्रकल्पातून शेतकऱ्यांना जनतेला पाणी मिळण्यासाठी व उर्वरित सिंचन क्षमता पूर्ण करण्यासाठी तेथील लोकप्रतिनिधीनी दिनांक १९ मे, २०१५ रोजी संबंधित अधिकाऱ्यांसमवेत पाहणी केली असता, सदरहू पाहणीमध्ये प्रकल्पाचे काम अर्धवट व सदोष असल्याचे निदर्शनास आले, हे खरे आहे काय,
(४) असल्यास, सदरहू प्रकल्पास विलंब होण्याची कारणे काय असून, त्याबाबत जबाबदार असलेल्या संबंधितांवर शासन कोणती कारवाई करणार आहे,
(५) सदरहू प्रकल्प तातडीने पूर्ण करण्यासाठी शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(६) नसल्यास,विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीष महाजन (२३-१०-२०१५) :**(१) कार नदी प्रकल्पास मूळ प्रशासकीय मान्यता दि.०६/०६/१९८० रोजी देण्यात आली आहे.प्रकल्पाचे एकूण ६७४४ हेक्टर सिंचन क्षमतेपैकी जून, २०१५ पर्यंत ५३५८ हेक्टर (८०%) सिंचन क्षमता निर्माण करण्यात आली आहे.

(२) प्रकल्पाचे धरणाचे काम १००% पुर्ण झाले आहे.मुख्य कालव्याचे ९०%व वितरण प्रणालीचे काम ८० % पुर्ण झाले आहे.

(३) दि.३१/०५/२०१५ रोजी संबंधित अधिका-यांसोबत लोकप्रतिनिधींनी लोहारी सावंगा वितरिकेवरील जलसेतूचे कामास भेट दिली होती. जलसेतूचे काम सद्यःस्थितीत प्रगतीपथावर आहे. जलसेतुच्या उर्ध्व बाजुच्या भरावातील कि.मी. ४ ते ६ मध्ये गळती आढळून आली. आवश्यक दुरुस्ती करण्यात येत आहे.

(४) व (५) या प्रकल्पाचे उर्वरित कामे पुर्ण करण्याकरीता सुधारित प्रकल्प अहवालामध्ये शिल्लक कामांचा समावेश करुन त्यास सक्षम स्तरावरुन मान्यता घेणेचे दृष्टीने आवश्यक कार्यवाही प्रगतीत आहे. तसेच या प्रकल्पास सन २०१५-१६ या आर्थिक वर्षात रु.४.५० कोटीची तरतूद आहे. प्रकल्पाचे काम जून, २०१७ पर्यंत पूर्ण करण्याचे नियोजन आहे.

(६) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## संत तुकाराम महाराज चतुर्थ जन्म शताब्दी निमित्त तिर्थ क्षेत्र विकासासाठी आराखड्या अंतर्गत मंजूर कामे पूर्ण करण्याबाबत

**(४४) २६९६७ (१७-०८-२०१५). श्री.सुभाष देशमुख (सोलापूर दक्षिण) :** सन्माननीय **नियोजन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) संत तुकाराम महाराज चतुर्थ जन्म शताब्दी निमित्त तिर्थ क्षेत्र विकासासाठी ५६० कोटी रुपयांचा आराखडा शासनाने मंजूर केला होता, असे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) तसेच या आराखड्या अंतर्गत मंजूर कामापैकी कोणती कामे पूर्ण झाली आहेत व कोणत्या कामावर किती निधी खर्च झाला,

(३) असल्यास, या आराखड्या अंतर्गत मंजूर कामे पूर्ण करण्याबाबत कोणती उपाय योजना करण्यात आली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. सुधीर मुनगंटीवार (०५-१०-२०१५) :**(१) हे अंशतः खरे आहे.

शासन निर्णय दि. १२/९/२०१४ अन्वये श्री. क्षेत्र देहू आळंदी, पंढरपूर, भंडारा डोंगर, नेवासा पालखीतळ / मार्ग आराखडयामध्ये रु. १०९४.८९ कोटी इतक्या शासन सहभागाच्या सुधारित आराखडयास मान्यता देण्यात आली आहे.

(२) श्री. क्षेत्र दहू, आळंदी, पंढरपुर, भंडारा डोंगर, नेवासा, पालखीतळ/मार्ग विकास आराखडयाअंतर्गत पुर्ण झालेली कामे, तसेच कामनिहाय खर्च आकडेवारीचा तपशील सोबत जोडला आहे.

(३) सदर आराखडयांची अंमलबजावणी यंत्रणा ही विभागीय आयुक्त, पुणे यांचे अंतर्गत असून त्यांच्या स्तरावरुन आराखडयांतर्गत कामाचा वेळोवेळी आढावा घेण्यात येतो. आराखडयातील कामे विहित मुदतीत करण्यात येत आहेत.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## दक्षिण सोलापूर पंचायत समितीच्या इमारतीचे बांधकाम जागेअभावी प्रलंबित असल्याबाबत

**(४५) २६९९४ (१७-०८-२०१५). श्री.सुभाष देशमुख (सोलापूर दक्षिण) :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) दक्षिण सोलापूर पंचायत समिती इमारत बांधण्यासाठी ३ कोटी रुपयांची तरतूद केली होती, परंतु जागा उपलब्ध नसल्याने इमारतीचे काम मागील सहा वर्षापासून प्रलंबित असल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर इमारतीस जागा उपलब्ध करुन देण्यासाठी कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्रीमती पंकजा मुंडे (१५-१०-२०१५) :** (१) अंशत: खरे आहे.

(२) अस्तित्वातील जागा महानगर पालिका क्षेत्रात येत असल्याने पंचायत समितीच्या नवीन इमारत बांधकामास स्थानिक नगर रचना प्राधिकरणाची परवानगी मिळण्याबाबत सोलापूर जिल्हा परिषदेने म.न.पा. सोलापूर जिल्हा परिषदेने म.न.पा. सोलापूर यांच्याकडे दिनांक १९.०८.२०१५ रोजी प्रस्ताव सादर केला असून, बांधकाम परवाना मिळण्यासाठी पाठपुरावा करण्यात येत आहे.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

## मुंबईतील सुभाषनगर, चेंबूर येथील म्हाडा वसाहतीमधील काही इमारतींचे सुरू झालेले पुनर्विकासाचे काम बंद असल्याबाबत

**(४६) २८०४४ (१०-०८-२०१५). श्री.तुकाराम काते (अणुशक्ती नगर) :** सन्माननीय **गृहनिर्माण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबईतील सुभाषनगर, चेंबूर येथील म्हाडा वसाहतीमधील काही इमारतींचे सुरू झालेले पुनर्विकासाचे काम सध्या बंद पडले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर म्हाडा वसाहतीचे पुनर्विकास कामासंबंधात स्थानिक लोकप्रतिनिधींनी दिनांक २० जानेवारी, २०१५ रोजी मा.गृहनिर्माण मंत्री यांना निवेदन सादर केले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर निवेदनाच्या संदर्भात काय कारवाई करण्यात आली आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. प्रकाश मेहता (०३-१२-२०१५) :** (१) खरे आहे.

(२) खरे आहे.

(३) सदर निवेदनाच्या अनुषंगाने मा. मंत्री, गृहनिर्माण यांनी उपाध्यक्ष महाराष्ट्र गृहनिर्माण व क्षेत्रविकास प्राधिकरण यांना बैठक आयोजित करण्याचे आदेश दिले आहेत. त्यासंदर्भात उपाध्यक्ष, महाराष्ट्र गृहनिर्माण व क्षेत्रविकास प्राधिकरण यांनी त्यांचे अभिप्राय मा. मंत्री, गृहनिर्माण यांचे कार्यालयास तसेच श्री. राहुल शेवाळे खासदार यांना त्याचे दि. १३.५.२०१५ च्या पत्रान्वये कळविले आहेत.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**नागपूर शहरातील झिंगाबाई टाकळी येथील इमारतीत पावसाचे पाणी शिरल्याने नागरीकांचे नुकसान झाल्याबाबत**

**(४७) ३२५२९ (२१-०१-२०१६). श्री.विकास कुंभारे (नागपूर मध्य), श्री.कृष्णा गजबे (आरमोरी) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) नागपूर येथील झिंगाबाई टाकळी या परिसरातून वाहणाऱ्या पिवळी नदीच्या काठावर बांधण्यात आलेल्या इमारतीत माहे ऑगस्ट, २०१५ मध्ये झालेल्या जोरदार पावसामुळे पाणी साचून नागरीकांच प्रचंड नुकसान झाले होते, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर इमारती झोपडपट्टी पुनर्वसन योजनेअंतर्गत बांधण्यात आले आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, सदर इमारतींना दर वर्षी पावसाळयात पुराचा धोका निर्माण होतो व नागरीकांचे अतोनात आर्थिक नुकसान होते, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय,
(५) असल्यास, सदर भागातील नागरीकांना पुरापासून कायमस्वरुपी संरक्षण देण्यासाठी कोणती उपाययोजना करण्यात आली वा येत आहे ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (२१-०३-२०१६) :** (१) अंशत: खरे आहे.
(२) होय.
(३) अंशत: खरे आहे. परंतु अतोनात आर्थिक नुकसान झाल्याबाबत असे कोणतेही पत्र महानरगपालिकेस प्राप्त झालेले नाही.
(४) व (५) अतिवृष्टी झाल्यांनंतर आलेल्या पुराचे पाणी अडविण्याकरिता संरक्षण भिंत बांधणे आवश्यक असून, त्याअनुषंगाने आवश्यक कार्यवाही नागपूर महापालिका स्तरावर प्रस्तावित आहे.

---

**नागपूर महानगरपालिका अंतर्गत असलेले अग्निशमन विभागातील विविध संवर्गातील रिक्त पदे भरण्याबाबत**

**(४८) ३२५३१ (२१-०१-२०१६). श्री.विकास कुंभारे (नागपूर मध्य), श्री.सुधाकर देशमुख (नागपूर पश्चिम), श्री.कृष्णा खोपडे (नागपूर पूर्व), श्री.सुधाकर कोहळे (नागपूर दक्षिण) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नागपूर महानगरपालिका अंतर्गत असलेले अग्निशमन विभागातील स्थानकाधिकाऱ्यांची ३ पदे, सहाय्यक स्थानकाधिकाऱ्यांची १४ पदे फायरमनची ५७ आणि चालकांची २७ पदे रिक्त असल्याचे माहे ऑक्टोबर, २०१५ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर रिक्त पदे भरण्यासंदर्भात कोणती कार्यवाही करण्यात आली वा येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाचे कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (२१-०३-२०१६) :** (१) होय.

(२) व (३) महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम ५१ (४) नुसार राज्य शासनाच्या पूर्वमंजूरीशिवाय कोणतेही नवीन पद निर्माण करता येत नाही. त्याअनुषंगाने नागपूर महानगरपालिका ठराव क्र. ३६ दि. १६/७/२०१२ व ठराव क्र. ९७ दिनांक १८/०५/२०१५ अन्वये नागपुर महानगरपालिकेच्या अग्निशमन व आणिबाणी सेवा विभागाचा आकृतीबंध प्रस्ताव शासनाच्या मान्यतेसाठी प्राप्त झाला असून, प्रस्ताव शासनाच्या विचाराधीन आहे.

---

**अकोला महानगरपालिकेकडून जलकुंभावरुन पिण्याचे पाणी विक्री करण्यात येत असल्याबाबत**

**(४९) ३३८७३ (२१-०१-२०१६). श्री.रणधीर सावरकर (अकोला पूर्व) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) अकोला महानगरपालिकेकडून जलकुंभावरुन नागरिकांना माहे ऑक्टोबर, २०१५ पासून पिण्याचे पाणी विक्री करण्यात येत असल्याचे निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, अकोला शहराच्या अनेक भागात जलवाहीन्याच टाकल्या नसल्याने नागरीकांना पिण्यासाठी जलकुंभावरुन पाणी विकत घ्यावे लागते, हेही खरे आहे काय,

(३) असल्यास, अकोला शहराला पाणी पुरवठा करणाऱ्या मुख्य जलवाहीन्यांवरुन अवैध नळ जोडण्याद्वारे २४ तास पाणीपुरवठा होत असल्याने पाणी टंचाई निर्माण होण्यास महापालिका प्रशासन जबाबदार आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, शहरातील पाणीपुरवठा सुरळीत करण्यासाठी शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (२१-०३-२०१६) :** (१) नाही. अकोला महानगरपालिका जलकुंभावरुन नागरिकांना पिण्याच्या पाण्याची विक्री करीत नाही.

(२) हे खरे नाही.

(३) हे खरे नाही.

(४) अकोला महानगरपालिका मनपा निधी व शासन निधी मधून पाणीपुरवठा सुरळीत करण्याकरिता कामे करीत आहे. तसेच केंद्र शासनाच्या अमृत योजने अंतर्गत अकोला शहराचा समावेश आहे. महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाकडून प्रकल्प अहवाल तयार करण्याचे काम प्रस्तावित आहे.

---

**बीएसडब्ल्यूचा (बॅचरल ऑफ सोशल वर्क) नवीन अभ्यासक्रम**
**प्राप्त झालेला नसल्याबाबत**

**(५०) ३५३२७ (२०-०१-२०१६). श्री.चंद्रकांत सोनावणे (चोपडा) :** सन्माननीय **उच्च व तंत्र शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) बीएसडब्ल्यू च्या (बॅचरल ऑफ सोशल वर्क) दहा विषयांचा अभ्यासक्रम बदलला असून इंग्रजी हा विषय अनिवार्य केला असतानाही या विषयाचा नवीन अभ्यासक्रम माहे ऑक्टोबर २०१५ पर्यंतही प्राप्त झाला नाही, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, विदयापीठाची सर्व प्राधिकरणे दिनांक ३१ ऑगस्ट, २०१५ रोजी बरखास्त झाली असून नवीन प्राधिकरणे तयार करण्यात आली नसल्याने अभ्यास मंडळ प्राधिकरणाने नविन अभ्यासक्रम तयार केला नाही, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, यामुळे जळगांव, चोपडा, अमळनेर, मोराणे जि.धुळे आणि तळोदा जि.नंदूरबार या महाविदयालयातील विदयार्थ्यांचे शैक्षणिक नुकसान होणार आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. विनोद तावडे (०५-०३-२०१६) :** (१) हे खरे आहे.

(२) विद्यार्थ्यांचे शैक्षणिक हित लक्षात घेऊन विद्यापीठाने मागील अभ्यासक्रमानुसार कार्यवाही केलेली आहे. त्यामुळे कोणत्याही विद्यार्थ्याचे शैक्षणिक नुकसान झालेले नाही.

(३), (४) व (५) प्रश्न उद्भवत नाही.

---

**विधान भवन :** **डॉ. अनंत कळसे**
**मुंबई.** **प्रधान सचिव**
**महाराष्ट्र विधानसभा.**

शासकीय मध्यवर्ती मुद्रणालय, मुंबई.